

मी कोणत्याही पक्षाचा नाही.
अमुक पक्षाचा विरोधक नाही.
सत्तारूढ पक्षाचा प्रमुख विरोधक
म्हणून मी सतत राहीन–

–चो
संपादक ‘तुघलक’

# माणूस


शनिवार । १३ मार्च १९७१
चाळीस पैसे

शनिवार १३ मार्च १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : एकूणसत्तरावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशाची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

□ मी आपल्या द्विसाप्ताहिकाचा एक नियमित वाचक आहे. आपल्या १३ फेब्रुवारीच्या अंकातील श्री. सुनील प्रधान, ठाणे यांचे जनरल करिअप्पा यांच्या बद्दलचे विचार वाचले. त्यांनी आपल्या विचारापुष्टचर्थ खूप पुरावेसुद्धा दिले आहेत. परंतु पुष्कळ गोष्टी ते सोयीस्करपणे विसरले आहेत. तरी माझे विचार आपण प्रसिद्ध कराल अशी अपेक्षा.

' करिअप्पा, केवळ एका प्रतिष्ठेच्या मतदार संघातून एका तथाकथित राष्ट्रवादी म्हणविणाऱ्या पक्षाच्या उमेदवाराविरुद्ध उभे आहेत म्हणून लेखकाने तसे विचार व्यक्त केले असावेत कारण फक्त ईशान्य मुंबईत जनसंघाला करिअप्पा हे पाक• धार्जिणे वाटतात. परंतु या पक्षाचे अध्यक्ष आणि इतर नेते त्यांना इतर दुसऱ्या मतदारसंघातून लोकसभेवर पाठवायला तयार असल्याचे त्यांच्या जाहीर सभातील भाषणातून कळेल. इतकेच नव्हे तर राज्यसभेत त्यांना पाठवण्याचा आम्ही खास

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक,

प्रयत्न करू असासुद्धा त्यांचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

संघाच्या युवक आघाडीतर्फे त्यांची बौद्धिकेसुद्धा होत असत. त्यावेळी करिअप्पा पाकधार्जिणे नव्हते परंतु आता प्रा. आगासकरांना विरोध करण्यास उभे राहिल्याबरोबर एक महान सेनानीची, गुडघ्याला बाशिंग बांधून, ' लग्ना अजूनी लहान, ' पाकधार्जिणा अशा शब्दात हेटाळणी केली जाते. अरेरे, काय हे घाणेरडे राजकारण ! प्रधान आपण जरा अटल बिहारी वाजपेयी आणि बलराज मधोक यांची भाषणे पडताळून पहा !

१५ फेब्रुवारी, १९७१ सुभाष सुळे, ठाणे

□ आपल्या साप्ताहिकात नव्याने चालू झालेल्या क्रीडांगण सदराचा मी एक वाचक आहे. देशी खेळांना आपल्यासारख्या दर्जेदार साप्ताहिकाने संपूर्ण प्राधान्य देण्याचे ठरविले याबद्दल खास अभिनंदन.
ता. ३ फेब्रुवारीच्या माणूसच्या अंकात 'आता यांना हाकलले पाहिजे' या शीर्षकाखाली अखिल भारतीय कबड्डी असोसिएशनच्या कारभारावर कडक टीका आली आहे. महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनच्या कामाचे कौतुकही त्यात केले आहे.
वस्तुत: महाराष्ट्र कबड्डी असोशिएशनचा कारभारही काही लोकांच्या कंपूच्या हातातच सर्वस्वी आहे. आणि खेळापेक्षा इतर वैयक्तिक महत्त्वाकांक्षा व मानापमान यांना यात अधिक महत्त्व मिळते हे माझ्यासारख्या क्रीडारसिकास माहीत आहे.
स्तंभलेखक डॉ. दाभोळकर हे महाराष्ट्रातले कबड्डीतले एक नामवंत खेळाडू असून त्यांना महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनच्या गैरकारभाराची बरीच माहिती असणार. त्यांनी आपली लेखणी याही कंपूविरुद्ध चालविल्यास महाराष्ट्रातील देशी खेळांचे भले होणार आहे.
क्रीडांगण हे सदर देशी खेळांसाठीच चालू ठेवावे ही विनंती.

२३ फेब्रुवारी, १९७१ गोपाळ माने, नागपूर.

□ 'माणूस'चा मी प्रथमपासूनचा वाचक, राजकीय व ललित लिखाणाचा समतोल 'माणूस'मध्ये साधला गेला होता; पण अलिकडे तो नाहीसा होऊन केवळ रुक्ष राजकीय लिखाणालाच प्राधान्य देण्यात येत आहे. तेंडुलकरांच्या 'रातराणी'चा अभाव जाणवतो, ती उणीव रविंद्र पिंग्यांची लेखणी भरून काढू शकत नाही.. 'माणूस'च्या दिवाळी अंकाने तर आमची फार निराशा केली. अरुण गोसावी व रविंद्र पिंग्यांच्या लेखाशिवाय खास वाचनीय असे काहीच नव्हते. चित्रपट परिक्षणे लिहिणाऱ्या आपल्या स्तंभ लेखकाची स्मरणशक्ती अजब आहे. 'जॉनी मेरा नाम'ची कल्याणजी आनंदजींची संगीतविषयक कामगिरी त्यांनी चक्क एस्. डी. बर्मनांच्या नावे नोंदवून स्तुती केली आहे. अशामुळे त्या लेखकाबरोबर ते सदरही हास्यास्पद वाटू लागते.

२७ फेब्रुवारी, १९७१ महादेव मोरे, निपाणी

# तुघलक....
# सत्तेविरुद्ध साधी चुरचुरीत लेखणी काय करू शकते ?

'हमको हिंदी नहीं आता' अशी अडखळत सुरुवात करणारा तो छत्तीसीतला वक्ता तामिळनाडूच्या द्रविड मुन्नेत्र कळहमचा कुठल्याही विरोधी पक्षापेक्षा मोठा शत्रू होता.

चो त्याचे नाव. लाडाने, कौतुकाने, प्रेमाने आणि आदराने तामिळनाडूमध्ये सुपरिचित असलेले हे नाव. खरे कागदोपत्री एस्. रामस्वामी. अगदी मूळ पोटा-पाण्याचा व्यवसाय वकिलीचा. सध्या ते मद्रासमध्ये टी. टी. कृष्णम्माचारींच्या कंपनीचे कायदा सल्लागार. पण सर्वसामान्यांना त्याची माहिती नाटककार, दिग्दर्शक, अभिनेता म्हणून. आता जनतेशी जवळीक 'तुघलक' नावाच्या वेगळ्या पाक्षिकाद्वारे.

वास्तविक हे नाव फक्त मद्रासपुरतेच मर्यादित रहायचे. पण सालेमला राम-स्वामी नायक्करच्या भगतगणांनी हिंदू देवतांचा मिरवणुकीमधून जाहीर अपमान केला. त्याचे फोटो 'तुघलक'मध्ये त्यांनी प्रसिद्ध केले आणि द्र. मु. क. सरकारच्या पोलिसांनी ते अंक जप्त केले. निरंकुश सत्ता असलेल्या द्र. मु. क. सरकारला आव्हान देऊन हा तरुण उभा राहिला, निवडणुकीचा मोसम होताच, त्यामुळे वर्त-मानपत्रातून देशभर चर्चेचा विषय झाला.

त्याच्या या बेडरपणाचे कौतुक करण्यासाठी दिल्लीत जनसंघाने मानपत्र दिले, त्याला उत्तर म्हणून रीगल पार्कच्या सभेत तो बोलत होता.

क्रीम कलरचा सूट, सोनेरी फ्रेमचा चष्मा, आकर्षक व्यक्तिमत्त्व कुठल्यातरी रोमँटिक नाटकाच्या रंगमंचावरून किंवा सिनेमाच्या शूटिंगनंतर सरळ या व्यास-पीठावर आल्यासारखे.

हिंदीतून बोलण्याबद्दल असमर्थता व्यक्त करून मग इंग्रजीतून ते मिश्किल, चुर-चुरीत बोलणे सुरू झाले.

प्रथम कृतज्ञता. द्र. मु. क. सरकारविषयी. एका रात्रीत नॅशनल हिरो करून टाकल्याबद्दल. मग जनसंघाच्या एम्. एल्. सोंधींविषयी. मानपत्राबद्दल.

'मी कोणत्याही पक्षाचा नाही. अमुक पक्षाचा विरोधक नाही. सत्तारूढ पक्षाचा प्रमुख विरोधक म्हणून मी सतत राहीन. चुका दाखवून त्यांना बहकू न देण्यात माझी शक्ती, बुद्धिमत्ता खर्च करीन.'

करुणानिधींचे सरकार हे काही त्याच्या टीकेचे पहिले लक्ष्य नाही. या आधी भक्तवत्सलम् होते. त्या आधी काँग्रेसचे सरकार होते. त्यांच्यावरही मर्मभेदी टीका केली. माध्यम-तेव्हा नाटकाचे चुरचुरीत उपहासगर्भ पण भेदक विनोद भाषेचे हे वैशिष्ट्य. अण्णादुराईंनी ही 'स्पष्टपणा, धैर्य आणि जनहिताविषयीचा प्रामाणिकपणा' याबद्दलच त्याचं कौतुक केलं होतं. कामराज त्याच्या विनोदाने घायाळ झाले होते. मुक्तीच लिहिलेली उपहासिका 'एन्रू थानियम इन्था सुर्यांधिरा' ( सत्तेची ही तहान केव्हा भागेल ? ) सादर केली, तीन महिन्यात पन्नास प्रयोग केले. प्रत्येक प्रयोगाला नवा प्रेक्षक खेचला. अजूनही 'हाऊस फुल्ल.' त्यातला विनोद इतका झोंबला की करुणानिधींनीही त्याला उत्तर म्हणून एक नाटक लिहिले-पडले !

'इंदिरा गांधींना आणि त्यांच्या पक्षाला मत का द्यायचं नाही? ही बाई आपल्या बापाने दिलेले वचनही-माजी संस्थानिकांना पाळू शकत नाही, तर स्वतः देत असलेली आश्वासनं काय पाळणार?"

चो बोलत होता. 'इंदिराबाईने हिंदु-मुस्लिम, छोटी छोटी राज्ये करून भारतातील भावंडांना एकमेकांपासून दूर केलं. स्त्री आपल्या लेकरांना जवळ ठेवते म्हणतात, इथे ही बाई भांडणं लावून देते आहे.'

शेम, शेम.

'माझ्या आधीच्या वक्त्यांनी राष्ट्रपतींना रबर स्टॅम्प म्हटले. माझा त्याला विरोध आहे-कारण रबर स्टॅम्प मारायचा म्हणजे तो कुणीतरी उचलावा लागतो-'

'सालेम प्रकरण सध्या कोर्टात आहे. त्याविषयी टीका करणे गुन्हा होईल. पण माहिती सांगायला हरकत नाही. त्या रामस्वामी नायक्करच्या पाठीराख्यांनी हिंदु देवांविरुद्ध मिरवणूक काढली. अश्लील, बीभत्स नृत्य करीत अनेक स्त्री-पुरुष त्या मिरवणुकीत होते. त्याबद्दलही काही म्हणायचे नाही. पण मिरवणुकीत पोस्टर्स होती देवता शृंगार करीत असल्याची. अत्यंत अश्लील, हिडीस असलेल्या त्या चित्रांवर स्वामी नायक्करांचे चेले जोडे, चपला मारीत होते-

पोलिस शांतपणे बघत होते. कोठल्याही धर्मातल्या समंजस माणसाला चीड आणणारे हे ओंगळ दृश्य पाहून काही तरुणांनी मिरवणूक विरोधी निदर्शने सुरू केली, तेव्हा पोलिसांनी त्यांनाच उलट अडकवून ठेवलं-

मला तो प्रकार समजला तेव्हा तिथल्या वृत्तपत्र छायाचित्रकारांकडून काही फोटो मागवून घेतले. पंधरा फेब्रुवारीच्या अंकात ते प्रसिद्ध करायचे ठरविले.

सरकारला कुठून तरी बातमी लागली. हा अंक कशाही तऱ्हेने जप्त करायचा असा त्यांचा निश्चय दिसला. ते मला कसं समजले ते सांगतो. त्या अंकाचे काम चालू होते. रात्री दोन वाजता मी प्रेसमध्ये गेलो. पोलिसांची जीप पाळत ठेवून उभी होती. आत शिपायाने सांगितलं की, ते लोक अंक कधी निघणार म्हणून चौकशी करीत होते.

सकाळी जुन्या अंकाचे गठ्ठे सायकलवर घेऊन शिपायाला बाहेर चक्कर मारून यायला सांगितलं. त्यापाठोपाठ ती जीपही निघाली एका पानाच्या दुकानापाशी तो थांबला तेव्हा ते अंक 'जप्त' करून पोलिस विजयी मुद्रेने निघून गेले. मग मी नेहमीच्या ६४ पानी अंकाऐवजी ३२ पानेच छापून भराभर बाहेर पाठवून दिले. बारा हजार प्रती झाल्या तेवढ्यात पोलिसांनी छापा घातला.

माझ्यातला वकील जागा होताच. इन्स्पेक्टरला सांगितलं, ते फोटो असलेली पाने बाजूला करून बाकी छापू द्या ना! काय करावं त्याला कळेना. वरून तशा ऑर्डर्स नव्हत्या. त्यानें परवानगी दिली नाही. हा एक मुद्दा त्यांना केसच्या वेळी सतावत राहिल.'

चोंच्या तुघलकच्या पाठीशी द्र. मु. क. सरकार अगदी सुरुवातीपासून लागले. दोनच वर्षापूर्वी या बाळाचा जन्म झाला. दोन महिन्यानंतरच तुघलकवर बंदी घालायचा विचार सुरू झाला. पक्षाच्या काही कार्यकर्त्यांनी प्रकाशकाला 'मित्रत्वा'चा सल्लाही दिला—नियतकालिक स्वतःच बंद करा म्हणून. नाहीतर तुमच्या धंद्यावर परिणाम होईल!

पण तोपर्यंत अंकाचा खप साठ हजारांवर आला होता. या महिन्याच्या सुरुवातीस तो दीड लाखापेक्षाही जास्त होणार होता. जप्तीनंतर तो अजून वर जाईल, अशी त्याची खात्री.

'आश्चर्य वाटते ते याचे की, हिंदु देवतांचे अश्लील हावभाव दाखविणाऱ्या चित्रांनी किंवा त्यांच्यावर जोडे-चपला हाणण्यांनी हिंदुंच्या भावना दुखावल्या जात नाहीत पण एक महिन्यानंतर घटनेचे फोटो प्रसिद्ध केल्यामळे या दुखावल्या जातील या द्र. मु. क. सरकारच्या अचाट बुद्धीचे.'

हे सरकार मद्रासच्या इतर वर्तमानपत्रांवरही चिडून आहे. 'हिंदु'च्या सरकारी जाहिराती बंद केल्या आहेत. इतर तऱ्हेनें देखील अडवणूक चालू आहे. आता 'तुघलक' जाहीर आखाड्यात उतरल्यामुळे इतर वर्तमानपत्रेही मोकळ्या आवाजात बोलू लागली आहेत.

'पण त्यामुळेच मी कृतज्ञही आहे. या घटनेमुळे द्र. मु. क.ने मला जाहीर सभांतून बोलणारा वक्ता बनविले. एक आठवड्यापूर्वी मी कधी असं भाषण केलं नव्हतं. लोक म्हणतात, मी नेहरूंसारखी गर्दी खेचतो. करुणानिधी, इंदिरा गांधींना जमणार नाही ती गोष्ट गेल्या आठवड्यात घडली. माझ्या सभेला चार ते पाच लाख श्रोते होते महाराज! आणि हा आकडा माझा नाही, आकाशवाणीवरून सांगितलेला आहे!'

आज फड जिंकणारा वक्ता म्हणून प्रसिद्ध होऊ लागलेल्या चोंने पदवी मिळाल्यानंतर दोन वर्षांनी १९५५ मध्ये पहिले नाटक लिहिले. त्यानंतर आणखी डझनभर लिहिली. सर्व मिळून पंधराशे प्रयोग झाले असावेत. त्याचा चाळीस हौशी कला-

कारांचा एक संग्रही आहे. त्यापैकी लेखन, दिग्दर्शन व निर्मिती चोकडे.

भावुक दिसणारा हा असा माणूस सिनेमात देखील काम करतो हे याचे आश्चर्य वाटायला नको. आतापर्यंत बत्तीस चित्रपटात काम केले आहे. आयुष्यांत प्लॅनिंग असे काही केलेच नाही, हे पाक्षिक 'तुघलक' हा सुद्धा एक अपघातच.

'काही लोक प्रचारात इंदिरा गांधींबद्दल गाणी गात असल्याचे ऐकतो. मला या लोकांचे आश्चर्य वाटते. कारण या बाईंविषयी मी विचार करतो तेव्हा सुद्धा गायचे विसरून जातो.'

'तुघलक' ही आता एक संस्था झाली आहे. द्र. मु. क. ची नंबर एकची शत्रू. सत्तेविरुद्ध साधी चुरचुरीत लेखणी काय करू शकते याचा हा नमुना. निवडणुकीत द्र. मु. क. ला अपयश आलं तर त्याचा मोठा वाटा चोकडे आणि त्याच्या तुघलक कडे जाईल हे द्र. मु. क. वाले सुद्धा मान्य करतील.

'कुणी मला विचारलं की इंदिरा गांधींविषयी कौतुक करण्याजोगे तुम्हाला काही आढळतच नाही का तर मी सांगतो– "हो आहे ना, बाईंनी एक वर्षात आपली राजवट गुंडाळली ही किती चांगली गोष्ट'

तिकडे तामिळनाडूत निवडणूक प्रचार चालू असताना चो धावपळ करत एक दिवसासाठी दिल्लीत आला त्याला कारण तसेच होते. एक मार्च रोजी त्याचा तामिळ बोलपट 'महंमद बिन तुघलक' प्रकाशित व्हावा अशी धडपड होती. मूळ-नाटकाचेच ते रूपांतर. असल्याने राज्य सरकारने काही भागांवर हरकत घेतली होती. एकूण पंधरा ठिकाणी काटछाट झाली. केंद्रीय सेन्सॉर बोर्डाकडून मंजुरी मिळ-विण्यासाठी तो दिल्लीत आला होता. पाच 'कटस्' या बोर्डानेही करायला लावले.

चो म्हणतो, 'गंमत आहे. याच नाटकाचे २८० प्रयोग होऊन गेले, कुणी हरकत घेतली नाहीं. याच नाटकाची लाँग प्ले रेकॉर्ड काढली. तिच्या दोन ते तीन हजार प्रती खपल्या तेव्हाही कुणी हरकत घेतली नाही. पण जाऊ द्या आहे ते सुद्धा थोडे थोडके नाही. निर्मात्यांच्या सोयीसाठी तडजोड केली.'

इतक्या प्रभावी नाटकाचे कथानक आहे तरी काय? चोने नंतर पत्रकारांना 'कटस्' कोणते ते सांगितले. त्यावरून थोडी कल्पना येऊ शकेल.

महंमद बिन तुघलक तामिळनाडूच्या पंतप्रधान पदाची शपथ घेतो तेव्हा स्तुति-पाठकांपैकी एक स्त्री विचारते, "मीं साधी निवडून देखील आलेलो नाही मग मंत्री कशी होणार?"

तुघलक म्हणतो, "मग राज्यसभा कशासाठी आहे"

पंतप्रधान तुघलक म्हणतो, "आता मला कुणी विरोध करू शकणार नाही, काही तरी पोरकट खेळ खेळावासा वाटतो. काय करावं बरं? हा, चला बँकांचं राष्ट्रीयी-करण करून टाकू."

पृष्ठ ५६ वर

# लोकलमधे भेटलेला एक नक्षलवादी

**सुरेश कुष्टे**

चर्चगेटला जाण्यासाठी, टळटळीत दुपारच्या वेळी मी गाडीची वाट पहात उभा आहे. दिवसाची गाडी म्हणजे एक एक तासानंतर येणारी, आणि त्यात पुन्हा 'स्लो' ट्रेन! मनातल्या मनात पुरता कातावलो होतो! रखरखत्या दुपारी स्टेशनवर गाडीची वाट पहायला लागणं ही गोष्टच चीड आणणारी असते. सकाळचा तरतरीतपणा, चटपटीतपणा सारं काही विरून गेलेला असतो. पेपर स्टॉलवरची गरमगरम बातम्या देणारी वर्तमानपत्रे दुपारी किती. निर्जीव वाटतात! एरवी सकाळी चटकन् पाय वळतात त्या पेपरस्टॉलकडे. आता दुपारी बघवत सुद्धा नाही! वातावरण अगदीच बेचव असतं! प्रवासीसुद्धा मरगळलेले. दादरहून भाजी आणावयाला निघालेले भय्ये, कारखान्यात उशीरा गेल्यामुळे 'खाडा' झालेले उदास कामगार! सर्वत्र निर्जीव, उदास वातावरण!

खडखडत रखडत गाडी येते, फर्स्ट क्लासच्या डब्यात चढल्यावर मनाला जरा शांत वाटतं! डब्याचा हिरवा रंग डोळ्यांना अशा वेळी काय गारवा देऊन जातो! डब्यात चढताना 'काय हो, आज 'दांडी' काय ऑफिसला' असं म्हणत एक वृद्ध गृहस्थांनी प्रेमळपणे दटावत विचारलं. 'हो हो, पण आज एवढ्या दुपारचे तुम्ही कुठे चाललात?' मी डब्यात त्यांच्या शेजारी बसत विचारलं!

आमच्या छोटयाशा उपनगरात त्या वृद्ध गृहस्थांना गावातील लोक 'राजकीय कार्यकर्ता' म्हणून ओळखतात. कारण काँग्रेसच्या राजकारणात त्यांनी नेहमीच सक्रीय भाग घेतला होता. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वराज्यानंतर देखील! राजकीय धकाधकीत मार घेण्याची आणि मार देण्याची धमक अजून त्या वृद्ध शरीरात तशीच रसरशीतपणे दिसून येते. परवाच्या म्युनिसिपल निवडणुकीची गोष्ट. गावात विरोधकांचा जोर होता. म्हणजे विरोधकांचे तरुण कार्यकर्ते फार 'जोरात' होते? शहाण्या (म्हणजेच भित्र्या.) लोकांनी त्यांना तात्त्विक विरोध करायच देखील सोडून दिलं होतं! अन्यभाषिक काँग्रेसच्या तरुण (अगदी हाताच्या बोटावर

मोजता येण्याइतके थोडे) कार्यकर्त्यांत या जुन्या, जिद्दीच्या वृद्ध कार्यकर्त्यांनीच हुरूप आणला; जिद्द आणली, धैर्य आणले! माणूस मोठा आक्रमक, विरोधकांच्या आक्रमक कारवायांना भर स्टेशनवर आव्हान यांनीच दिले, "आमच्यापैकी एकाच्या तरी अंगावर हात टाकून पहा, एकेकाला ढेकणासारखे चिरडून टाकतो" म्हणून भर प्लॅटफार्मवर आव्हान! निवडणूकीत कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना नंतर फारसा त्रास झाला नाहीं. आणि नंतर ती निवडणूक आमच्या पक्षाने जिंकली! त्या रणधुमाळीत त्यांच्यासारख्या वृद्ध कार्यकर्त्याबरोबर बरोबरीच्या नात्याने बोलण्याची धिटाई (खरे म्हणजे आगाऊपणा) माझ्यात आली होती. सहज जाता जाता मनात विचार आला पार्टीचं काम करताना, धर्म भाषा, पैसा, वय यांच्या भिंती ढासळून माणसं कशी एकत्र येतात! एवढ्या त्यांच्यासारख्या वृद्ध पत्रकाराला (हो, ते 'केसरी'चे बातमीदार होते) माझ्या सारख्या तरुणाने "एवढ्या दुपारचे कुठे चाललात?" हा प्रश्न विचारयची हिम्मत झालीच नव्हती!

शेवटी आमचा विषय नेहमीप्रमाणे राजकारणाकडेच वळला. "मग काय अप्पा, तुम्ही कुणासाठी काम करणार? इंडिकेट की सिंडिकेट?" मी सरळसरळ प्रश्न केला.

मध्यंतरी बराच वेळ निघून गेला होता. त्या म्युनिसिपल निवडणुकीच्या वेळी आलेला निवडणूक 'ज्वर' निघून गेला होता. आणि नेहमीप्रमाणेच आम्ही कार्यकर्ते निष्क्रीय, बनलो होतो. एकमेकांची विचारपूस सुद्धा नव्हती. मग कोण कुठल्या बाजूला ही गोष्टच दूर!

"छे छे मी आता कोणाकडूनच काम करणार नाही, प्रथम या दोघांनी एक झालं पाहिजे. तर माझ्या मनाला बरं वाटेल. मग करू काम!" त्यांनी अगदी व्यथित होऊन सांगितले.

मला राहून राहून आश्चर्य वाटतं या कॉंग्रेस पक्षाबद्दल. त्याच्या या वृद्ध निष्ठावंत कार्यकर्त्यांबद्दल! खेडोपाडी कुठेही जा. अजून तुम्हाला खादीधारी म्हातारी माणसं कॉंग्रेसबद्दल आत्मियतेनं काळजी करताना दिसतील! कॉंग्रेस पक्ष हा त्यांच्या वैचारिक आवाहनाचा भाग नव्हता. ती त्यांची श्रद्धा होती, भक्ती होती. वेडी माया होती!

एवढा पक्ष दुभंगला पण हा गृहस्थ, कॉंग्रेसमध्ये चाळीस वर्षे घालवलेली, पण इंदिरा गांधींना दोष देत नव्हता की निजलिंगप्पांना!

'दोघांनी एक झालं पाहिजे' एवढंच त्याचं सांगणं होतं!

सुधाकरावर अविचल भक्ती करणाऱ्या 'सिंधु' सारखी जुनी मंडळी वाटली मला!

"ते काय आता तुमच्या-माझ्या सारख्या कार्यकर्त्यांच्या हातात थोडच आहे?" मी म्हणालो.

.. संभाषणाला पुन: एकदा खंड पडला. मला काही करून त्यांना बोलत करायच होतं ! विशेष कारण असं काही नव्हत पण अजून दादरपर्यंत जायच होतं ! आणि वेळ घालवायला राजकीय चर्चेसारखी चांगली गोष्ट नाही ! निष्पन्न काहीच होत नाही ! वेळ मात्र बराच जातो ! मला ते आवडतं !

पण हा गृहस्थ काही बोलायलाच तयार नाही !

" मग येत्या निवडणूकीत बाई बहुमतांत येणार की नाही ?" मी पुन: एकदा टोकून टोकून विचारलं.

" काही सांगता येत नाही " पुन: तेच मोघम उत्तर.

त्यांनी 'यणार नाही' म्हटलं तर 'येणार' असं सांगून आणि 'येणार' म्हटलं तर "नाही येणार" म्हणून वादविवाद करायच ठरवलं होतं ! पण गृहस्थ अगदीच अनुत्साही ! माझा अगदी विरस झाला ! चर्चेला रंग म्हणून येईना !

" काही म्हणा अप्पा इंदिरा गांधी 'मेजॉरिटीत' निवडून येणार, बाई मोठी बहादूर आणि हुशार आहे " मी इंडिकेटची बाजू मांडीत म्हटलं !

गाडी स्टेशनांवर थांबून पॅसेंजर आत घेत होती. आज अप्पांचा चर्चेचा मूडच नव्हता, आणि मला तर वादविदाची अगदी तल्लफच आली होती ! गोरेगावला एक काळसर रंगाचा, अतिशय तररीत, पण भेदक दृष्टीचा तरूण माझ्या समोर येऊन बसला.

आमच्या चर्चेकडे त्याच लक्ष होतं ! पण मराठी त्याला फारस समजत नसावं ! त्यामुळे तो ऐकण्याच काम करीत होता. क्षणभर मनाला वाटल कदाचित एखादा दाक्षिणात्य असावा. आजकाल मुंबईत मराठीत चर्चा चालू झाली की ही मंडळी एकदम कान टवकारून चर्चा ऐकायला लागतात. मला तर 'मद्रासीच' वाटत होता ! मराठी नव्हता इतकं खास ! नाही तर त्यानं नक्कीच चर्चेत तोंड घातलं असतं !

" She is going to get majority but not 2/3 majority for constitution amendment " शेवटी त्याला राहवलं नाहीच !

मी माझी चर्चा एकदम इंग्रजीत चालू केली ! शेवटी एक तरी 'बकरा' चर्चा करायला मिळाला तर गाडीत ! मी अगदी मनातून खूष झालो. अप्पांनी नाहीतरी मला फारच नाउमेद केलं होतं !

चर्चा सुरू झाली. मनूनच आमचं राजकीय अंदाजाविषयी एकमत होत होतं ! मला बरं वाटत होतही आणि नाहीही !

बोलता बोलता, मान उडवित तो म्हणाला, " Whether she comes in power or not, both are not good for India. "

'अरेच्च्या, हा संयुक्त समाजवादी दिसतोय, की कम्युनिस्ट ? मी मनात म्हटलं,

" How can you say so ? I definately feel there will be stabi-

lity, if she comes in power" मी 'आर्ग्यु' करायला सुरुवात केली.

"ते सारं ठीक आहे! पण स्थैर्याचासुद्धा काही उपयोग नाही! See Bengal, is she going to improve conditions there ?" त्यानं मला विचारलं.

मी कोण आश्वासन देणार होय का नाही म्हणून!

"ते बाकी खरं आहे! काय चाललंय त्या बंगालमध्ये काही कळत नाही! रोज दोन चार खून होत आहेत. सारं जीवनच अस्थिर झालंय!" अप्पांना आता बंगालची काळजी वाटायला लागली होती.

"Any way, these Naxalites must be tackled very firmly." या वेळीदेखील तो तरुण माझ्याशी सहमत होईल या अपेक्षेनं त्याच्याकडे पहात मी म्हणालो,

–आणि...?

आणि चर्चेचा सारा रंगच बदलून गेला.

"What do you know about Bengal ?" उसळून त्या आमच्या सह-प्रवाशानं आम्हाला विचारलं.

मी जरा चपापलोच! काही आपलं चुकलं तर नाही ना? या अपेक्षेनं मी अप्पांच्याकडे पाहिलं! तेही या प्रश्नानं माझ्यासारखेच गोंधळले.

आम्ही काही सांगायच्या आतच त्यानं पुन: सरबती सुरू केली, "या मुंबईच्या वर्तमान पत्रातील बातम्या वाचूनच म्हणतांना तुम्ही? एक जात सारी भांडवल-वाल्यांची वर्तमानपत्रे, त्यांनी बंगालची खरी स्थिती कधी सांगितलीच नाही लोकांना! नक्षलवादी, नक्षलवादी म्हणून आम्हाला बदनाम करता?"

बापरे! म्हणजे हा बंगाली बाबू होता तर! कदाचित नक्षलवादीसुद्धा असेल! माझं मन चुकचुकून गेलं!

बाकी आपण भारतीय काय विलक्षणसारखे दिसतो. त्या तरुणाला मी मद्रासी समजत होतो. एखादे वेळी त्यानं आपलं नाव कुलकर्णी, देशपांडे असं सांगितलं तर मला आश्चर्य वाटलं नसतं! पण रविंद्रनाथांच्या, शरदचंद्रांच्या वंगभूमीतला तो असेल हे कबुल करायला मन तयारच होईना! बंगाली माणसानं एकतर रविंद्र-सारखं दिसावं नाहीतर विवेकानंद, सुभाषबाबूंच्यासारखं! व्यक्तिविषयी, प्रांत-विषयी, देशाविषयी आपण किती विलक्षण पूर्वग्रह आपल्या संस्कारातून करून घेतो.

मी जरा बावरलोच, पण माझ्या पूर्वग्रहापेक्षा ही माणसं आपल्या कुलकर्णी जोशांसारखीच दिसतात म्हणून मन जरा चक्रावलंसुद्धा होतं! आणि त्यात पुन्हा नक्षलवाद्यांविषयी हिरीरीनं बाजू घेऊन भांडणारा, मला तर असा असामी प्रथमच भेटला होता!

"Remember my words, what Bengal thinks day, India will think tomorrow" त्यांचा बंगाली अभिमान अगदी उफाळून आला होता.

माझी तर जवळजवळ वाचाच बसली होती!

त्याला जरा शांत करण्यासाठी मग आम्हांनी मग वेगळीच तोंड काढली, "Sorry हं आम्हाला काही माहित नाही. पण बंगालमध्ये खरंच काय चाललंय? बंगालविषयी आम्हाला फार आदर आहे! सांगा तरी."

या आमच्या यशस्वी माघारीनं स्वारी जरा शांत झाली. पण मनातला कडवटपणा बोलण्यातुन दिसत होताच.

"बंगालला कुणी देशभक्ती शिकवायची गरज नाही. (हे म्हणजे अगदी आमच्या मराठी लोकांसारखं झालं!) बंगालने नेहमीच देशाचं नेतृत्व केलंय! बुद्धिमत्ता, देशभक्ती, कर्तृत्व यामध्ये आम्हीच नेहमी पुढे आहोत!" तो तावातावानं सांगत होता!

"हो अगदी खरं!" त्याला खुलविण्यासाठी मी म्हणालो, "पण मग आज बंगालची परिस्थिती एवढी बिकट का? (या तुम्हा अतिशहाण्यांचा बैल रिकामा का?) हे मात्र मनातल्या मनात, हो, नक्षलवादी होता तो!)

"Because of wrong policies of the congress Government" तो भेदक रीतीने पहात म्हणाला.

"हे मात्र काहीतरीच! आता आम्ही नाही या wrong policies विषयी ओरडत! पण म्हणून काय अराजक करायचं!" मी मनातल्या मनात पुटपुटायला लागलो!

"बाकी या काँग्रेसच्या wrong policies विषयी काही सांगू नका. बहो, त्यांची एकसुद्धा correct policy अजून एखाद्याला सापडली नाही. पण आपण नको का विचार करायला. उगाच आपलं घर जाळून डोक्यात राख घालायची म्हणजे काय?" मी आपलं समजाविण्याच्या स्वरात म्हणालो.

"It's now too late, I am afraid आता फार उशीर झाला आहे." तो म्हणाला, "तुम्ही जा कलकत्त्याला, रस्त्या-रस्त्यावर तुम्हाला पदवीधर मुलं बूट पॉलिश करताना दिसतील! सुशिक्षित बेकारांची केवढी मोठी समस्या (खरं तर समस्या हा शब्द अगदीच बेंगरुळ वाटायला लागलाय!) आहे बेंगॉलमध्ये! आम्ही अतिशय हुशार आहोत! (पुन्हा आपलं तेच–आम्ही गाढव मग तर झालं!) शिक्षणानंतर नोकऱ्या देणं हे सरकारचं काम नाही काय? ग्रॅज्युएट इंजिनियर्स फेरीवाल्याचं काम करतात. स्वतःची डिग्री सर्टिफिकेटस् त्या गाडीवर लावतात, "आम्ही इंजिनिअर्स आहोत. आम्हाला नोकरी नाही, पोटासाठी आमच्याकडून वांदे विकत घ्या, स्टोव्ह दुरुस्त करून घ्या." तो सांगत होता ते खरं की खोटं ते त्या दुर्गामातेलाच माहित! पण तो खोटं सांगत नसावा. बोलताना त्याचा स्वर कमालीचा कापरा झाला होता! कोमल मनाची माणसं फार संतापी असतात! एकाच वेळी तो चिडत होता आणि विद्धही होत होता.

"का बरं हे असं झालं ?" मी त्याच्या भावनांशी सहमत स्वरात विचारलं,

"या, या भांडवलदारांच्या मुळं ! आणि त्याची बटिक (हा एक अगदी जातिवंत कम्युनिस्ट शब्द) झालेलं हे आपलं अतुल्य घोषचं कॉंग्रेस सरकार ! गरीबांच्या प्रश्नाचा कधी विचारच केला नाही बंगाल सरकारनं ! Exploitation, पिळवणूक, निर्दय पिळवणूक !" "तुम्हाला माहीत आहे", तो सांगत होता, "बंगालमध्ये १९६९ पर्यंत कारखान्यातल्या कामगारांचा कामाचा दिवस १२ तासाचा होता ! म्हणजे सकाळी आठ ते रात्री आठ पर्यंत."

मला या गोष्टीची कल्पनाच करवेना, "तुमच्या महाराष्ट्रात आठ तासांचा दिवस १९४८ सालीच कायद्यानं करण्यात आला."

एवढी साधी गोष्ट होण्यासाठी बंगालला वीस वर्षे घालवावी लागली. याचा अर्थ एका पिढीचं सारं तारुण्य बरबाद झालं ! आयुष्य वाया गेलं !" तो पुन्हा एकदा गदगदून गेला.

मी विचारात पडलो ! बारा तासाचा दिवस ! म्हणजे मुंबई सारख्या ठिकाणी दूर वरून कामावर यायच असेल तर सकाळी ६ वाजता निघालं पाहिजे आणि रात्री १० वाजता घरी पोहचायचं !

"आणि हे कशासाठी ? तर या भांडवलशाही कारखानदारांना पगार जादा द्यावा लागू नये म्हणून ! आठ तासाचा दिवस प्रथम "ज्योति दां"नी केला (म्हणजे तेच ते ज्योति बसू !) कामगारांच्या संख्येत दीडपट वाढ झाली ! कॉंग्रेस सरकारनं का नाही ही गोष्ट केली ?"

मी काय उत्तर देणार ?

"मग निवडणूकीला पैसे कुठले मिळणार ?" त्यानंच उत्तर दिलं. "पंधरा-पंधरा वीस वीस वर्षे कारकुनांचे पगार बिलकूल वाढलेच नाहीत. १५० रुपये पगार ४७ साली आणि १५० रुपये पगार १९६९ साली. का नाही मग बस ट्रामची भाडी वाढली तर ट्राम जाळल्या जाणार ?"

हे मात्र फार झालं ! महागाई वाढली तरी गेल्या चार पाच वर्षांत आम्हा मुंबईकरांचे पगार देखील जरा वाढले खरे ! (अगदी आम्हा कॉलेज शिक्षकांचे देखील !)

"यावर आम्ही तरुणांनी संताप व्यक्त केला की आम्हाला कम्युनिस्ट म्हणता, नक्षलवादी म्हणता, कधी समजून घेतलय आम्हाला ? यातून आता मार्ग नाही ! त्यातून हे खून पडतात, जाळपोळी होतात ! या नक्षलवादी तरुणांनी आता एक यादीच तयार केली आहे, कुणा कुणाला ठार करायचं त्याची ! त्यात काळाबाजारवाले आहेत, लाचखाऊ सरकारी अधिकारी आहेत, पोलिस ऑफिसर्स आहेत,

पृष्ठ ४९ वर

# चंबळची हाक

दीनानाथ मनोहर

'मोरेना 'हून बस सुटली तेव्हा संध्याकाळचे पाच वाजत होते. मध्यप्रदेश स्टेट ट्रान्सपोर्टची बस शिगोशीग भरली होती. सर्वच प्रवासी उच्च स्वरात एकमेकांशी बोलत होते. बहुतेकांच्या ओठावर मिशांचे आकडे होते, शरीरे मजबूत होती. माझ्या शेजारीच हातात मार्क थ्री रायफल तोलीत एक भरदार मिश्यांचा, धारदार नाकाचा, उग्र चेहऱ्याचा प्रवासी माझ्याकडे अधूनमधून तीक्ष्ण दृष्टीकटाक्ष टाकीत, गुरगुरत आपल्या सोबत्याशी बोलत होता. बोलणाऱ्याची भाषा हिंदीच आहे एवढे समजत होते. बाकी देहाती उच्चारांमुळे आशय लक्षात येत नव्हता. वाटेत अम्बाह तालुक्याच्या गावी बैलांचा मेळा भरला होता. रस्त्याने अनेक शेतकरी बैल खरेदी करून परताना दिसत होते. बहुतेकांच्या खांद्यावर बंदुका दिसत होत्या. आर्मड पोलीस, स्टेट रिझर्व पोलीस ह्यांच्या टोळ्या रस्त्यात दिसत होत्या. पोरस्त मुक्कामी पोहचलो तेव्हा साडेसात वाजले होते.

मानसिंग-रूपा-डोंगरसिंग-लाखनसिंग ह्या आणि ह्यांच्यासारख्या अनेक डाकूमुळे कुप्रसिद्ध झालेल्या मोरेनाभिंड मधून आम्ही प्रवास करीत होतो. 'नॅशनल यूथ प्रॉजेक्ट 'च्या प्रिफरेटरी कॅम्पची जागा तेथून चार पाच मैल दूर होती. सामान पाठीवर टाकून चालत जाण्याच्या इराद्याने एस. टी. ऑफीसमध्ये चौकशी केली.–

"नो...आता जाण्याचा विचारही करू नका. तुम्ही परके लोक, भाषा येत नाही, ही ऑपरेशनल एरिआ...व्हेरी डेंजरस्–रात्री येथे झोपा, सकाळी पुढे जा"

जवळच एक एस. आर. पी. उभा होता. सल्ला तोच–मूर्खपणा करू नका. कुणीतरी लोकल पुढारी आला. उंच, सडपातळ, केस उलट वळविलेले, बाकदार नाक, टोकदार कोरलेल्या मिश्या, पातळ नाकपुड्या, वेष पुढाऱ्याचा पण तोंडावर टिपिकल पुढारी हास्य नव्हते. पर्सनॅलिटी एखाद्या हिंदी चित्रपटातील जमीनदारासारखी. सल्ला–'बेवकुफी मत करो' मनात खळबळ माजली. अंतर फक्त चार मैल, आणि डाकूंच्या भीतीने रात्र येथे काढावयाची ! आपण मध्ययुगात वावरत नाही ह्याची मनाला जाणीव करून दिली. स्वस्थ बसण्याची तयारी नव्हती, पण हार मानायच्या आधीच नशीबाने त्या दिशेने जाणारी एक गाडी आली. काही मिनिटातच कॅम्पवर पोहचलो. थंडी चांगलीच पडली होती. दोन दिवसांच्या प्रवासाने थकलो होतो. अंधारात बाजूबाजूच्या अज्ञात प्रदेशाची शांतता अधिकच भीतीदायक वाटत होती. अंथरुणावर अंग टेकताच निद्रेने आपल्या कुशीत घेतले.

'गांधी शांती प्रतिष्ठान' तर्फे श्री. सुब्बाराव ह्यांनी [illegible]

वेगवेगळ्या स्तरातील, संस्थातील, भागातील क्रियाशील स्वयंसेवकाना येथे बोलाविले होते. श्री सुब्बाराव अत्यंत शांत आणि गंभीर माणूस. गेल्या वीस वर्षांपासून समाजसेवेत कार्यरत. ह्या चंबळ खोऱ्यांवर तर त्यांचे विशेष प्रेम. आवाज अतिशय मधुर, गाणी म्हणावयाचा, म्हणून घ्यावयाचा छंद.

सॅन्ड रॅव्हीन्समुळे, ज्याला स्थानिक भाषेत बेहड म्हणतात. सुपीक असूनही, शेतीस निरुपयोगी झालेली हजारो एकर जमीन, आणि येथील माणसाचे संतापी भडक मन; हे ह्या भागातील महत्त्वाचे दोन प्रश्न. चंबळ आणि कुंवारी ह्या नद्यांच्या परिसरातील अशी उबडखाबड जमीन आहे साडेसहा लाख एकर. त्यातील तीन लाख एकर जमीन अशी आहे जी लागवडीस योग्य होऊ शकेल. जशी येथील जमीन उबडखाबड, तशीच येथील माणसाची मनेही उबडखाबड. आपसातील भांडणे, जातीमधील, घराण्यामधील पिढीजात वैर, विलक्षण संतापी मायी पोलीसांच्या चौकशीची अत्याचारी पद्धत, पुढाऱ्यांचा संधीसाधूपणा, काहीशी गरिबी, बराचसा अविवेकीपणा—परिणाम—केवळ कुंवारी नदीच्या खोऱ्यात २५०-३०० डाकू बेमान वावरत आहेत. येथील लोक डाकूंना डाकू म्हणत नाहीत, बागी म्हणतात. ह्या बागीची आपली एक नीती आहे. पैशासाठी, बागी झालेले फारच थोडे. जमिनीवरून भांडणे झाली, मारामारी झाली, पोलीसांपासून वाचण्यासाठी पळ काढला. चंबळेच्या खोऱ्यात लपण्यासाठी, दडण्यासाठी असंख्य जागा आहेत. ह्याच चंबळेच्या बेहडांनी, मोगलांच्या काळात, मराठ्यांच्या राज्यात, इंग्रजांच्या साम्राज्यात, कुणाचाही अधिकार, आधिपत्य सहन न करणाऱ्या बागींना आश्रय दिला होता. पोलीसांचा ससेमीरा चालू आहे, डाकू मरत आहेत. नवे लोक त्यांची जागा घेत आहेत. आधुनिक शस्त्रे त्यांच्यापर्यंत येऊन पोहचली आहेत. गेली वीस वर्षे वाढत्या पोलीस बळाबरोबरच गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत आहे.

दुपारी आम्ही टोळचाटोळ्यांनी आजूबाजूच्या खेड्यात जात होतो. गावातील राठोड पुढाऱ्यांशी खेड्यातील परिस्थितीबाबत चर्चा करीत होतो; महारवाड्यातील लोकांशी चार सुखदुःखाच्या गोष्टी बोलत होतो. संध्याकाळी पोरांना जमवून मजनवे खेळ शिकवित होतो. त्यांच्या मस्तीत आम्हीही धुंद होत होतो. भाषेचे माध्यम तितकेसे प्रभावीपणे वापरता येत नसे पण हृदयाची भाषा समजत होती. ह्या मुक्त मनाने आदरातिथ्य करणाऱ्या, प्रेम देणाऱ्या समाजातच अगणित खून करणारे बागी असू शकतात ही विसंगती मनाला पटत नव्हती. पण तरीही ती सत्य परिस्थिती होती. संध्याकाळी खेड्यातून परताना कुणीही खेडूत आम्हाला पोहचविण्यासाठी खेड्याची हद्द ओलांडून बाहेर येण्यास धजावत नव्हता.

पोलिस म्हणतात, "जनतेचे सहकार्य नाही, जोपर्यंत हे लोक डाकूंना अन्न धान्य पुरवितात, बातम्या पुरवितात, जोपर्यंत पुढारी, मत प्रचारासाठी टोळीप्रमुखांचे साह्य घेतात, तोपर्यन्त केवळ शस्त्रबळावर हा प्रश्न सोडविता येणे अशक्य आहे,"

सामान्य माणूस म्हणतो, "ना पोलिसांना हा प्रश्न मिटवयास हवा आहे, ना येथील पुढाऱ्यांना. पोलिसच डाकूंचे साहाय्यक. चौकशीच्या वरवंट्याखाली गरीब, निरपराध माणसे भरडली जातात, पोलिसांचे खबरे, मधले दलाल, राजकारणी धेंडे स्वार्थ साधतात."

लोकल पुढारी म्हणतात, "हा प्रश्न फक्त आमच्या प्रदेशापुरताच मर्यादित नाही-हिंसा कुठं नाही ? बंगालमध्ये काय चालले आहे ? पंजाबमध्ये काय झाले ? कॉलेजेस्मध्ये काय होतयं ? आमच्या भागाला बदनाम करण्यात आले आहे."

जवळच डोझर्सची घरघरं चालू आहे. मोठमोठी टेंकाडे कोसळवून जमीन सारखी करण्याचे काम चालू आहे. पाच वर्षाच्या दीर्घ मुदतीची योजना आहे. पाच हजार एकर जमिन लागवडीखाली आणावयाची आहे. कुंवारी नदीच्या काठाशीच कामे चालू झाले आहे.

भारतातील प्रत्येक राज्यामधून प्रतिनिधी आले होते. पाच वर्षात होणाऱ्या कार्याची रुपरेखा आखली जात होती. प्रॉजेक्ट ऑर्गनायझेशन–रिक्रुटमेंट–सोशल ॲक्टीव्हीटीज चर्चा रंगत होती. वेगवेगळी मतें व्यक्त केली जात होती, टीका होत होती, पूर्वानुभव सांगितले जात होते. जुन्या व नव्या पिढीतील विचारातील तफावत जाणवत होती. सर्वोदय पठडीत तयार झालेले काही लोक प्रार्थना, सामूहिक गीते, गांधी विचार ह्या विषयावर जोर देत होते. काही लोक कोणतीही आयडीऑलॉजी नको म्हणून प्रतिपादन करीत होते. तरूण वर्ग कमीत कमी नियम असावेत असा आग्रह धरीत होता. पण प्रत्येकजण ही योजना यशस्वी कशी होईल ह्या दृष्टीनेच विचार करीत होता. श्री. सुब्बाराव सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत होते. वादातून, चर्चेतून पुढे होणाऱ्या कॅम्प्सचा आराखडा तयार होत होता.

दोन-तीन दिवस झाले आणि आमचा आपसातील औपचारिकपणा संपला. आपण सर्व युवक आहोत, एवढी एकच भावना राहिली. मग युवामनाला साजेसे मक्त, मनमोकळे वातावरण निर्माण झाले. जेवणाच्यावेळी 'जय जगत्, जय जगत्, जय जगत् पुकारजा' हे सामुहिक गीत जितक्या उत्साहाने गाईले जात होते, तेवढ्याच उत्साहाने श्रमदानानतर 'हिप्पी हिप्पी या...या' ही आळविले जात होते. प्रौढ आणि तरूण एकमेकात सहजतेने मिसळले होते. मुलीही सर्वांमध्ये मोकळेपणी मिसळल्या होत्या. रस्त्यावरून जाणाऱ्या, प्रचार जीप्स, बाहेर देशभर चाललेल्या निवडणुकीच्या गोंधळाची, संघर्षाची क्षणैक जाणीव करून देत होत्या. पण कॅम्पमध्ये कुणीही निवडणुकीबद्दल बोलत नव्हते. समाजवाद, नक्षलवाद, भाषावाद, प्रांतवाद ह्या सर्व वादापासून आम्ही अलिप्त झालो होतो.

एके दिवशी सुब्बारावांचे शेजारी एक प्रौढ सडपातळ शरीरयष्टीचा मनुष्य बसलेला दिसला. डोळे घारे, मिस्कील पण तेजस्वी नजर, ओठांवर सहज हास्य, धोतर–जाकीट असा साधा वेष. जेव्हां ह्या माणसाची डाकू मोर्नीसगचा उजवा

ह्यात लुक्कसिंग म्हणून ओळख करून देण्यात आली तेव्हा आम्ही चकितच झालो. जमिनीच्या भांडणावरून वीस जीवाचे रक्त सांडून ह्या माणूस मानसिंगच्या टोळीत सामील झाला होता. विनोबाजींपुढे 'आत्मसमर्पण' करणाऱ्या अकराजणांपैकी एक. आम्ही प्रश्न विचारत होतो, 'तुम्ही शस्त्र कुठून आणत होता? टोळीत कसे सामील झालात? बंदूक चालवावयास केव्हा शिकलात? मुले आहेत काय? तुरुंगात त्रास झाला का? मुले काय करतात? पूर्वीसारखा लोकांत मान-दबदबा नाही—अशावेळी काय वाटते? पूर्वीचे स्नेही आता तुमच्याशी कसे वागतात? जनरल यदुनाथसिंह तुम्हाला कसे भेटले?' अनेक प्रश्न—लुक्कसिंग ऊर्फ लोकमानजी शांतपणे, निरागसपणे उत्तर देत होते. एक वेळ ज्याचे नाव ऐकून अंगाला कापरे भरत असे असा ह्या माणूस आता सामान्याचे जीवन जगतो आहे—समाधानाने.

विविध विचार, विविध मते—पण सूर एक होता. हे प्रश्न लोकांनीच निर्माण केले आहेत. त्यांच्यापासून नुकसानही लोकांचेच होत आहे. पुढारी—मग ते कोणत्याही पक्षाचे असोत, त्यांना सत्तेची हाव आहे, सामान्य माणसाची काळजी त्यांना नाही. प्रश्न आमचे आहेत, उत्तरे आम्हीच शोधली पाहिजेत. मग प्रश्न डाकूंचा असो, वा गरिबीचा. जातीभेदाचा असो वा शिक्षणाचा. पोलीस अत्याचाराचा असो वा विद्यार्थ्यांतील असंतोषाचा. ही जाणीव निर्माण होत आहे.

एप्रिलपासून येथे दोन दोन आठवड्याची युवक-शिबिरे सुरू होतील. देशातील जास्तीतजास्त तरुण आपली शक्ती येथे कामास लावतील. नोकरीच्या शोधात असलेले, शिक्षण घेत असलेले, सुशिक्षित—अशिक्षित, बुद्धिजीवी कामगार सर्व वर्गातील युवक आपले तारुण्यातील काही दिवस येथे देतील. आपल्या ज्ञानाचा फायदा आपल्या खेडूत बांधवास देतील; त्यांचे खडतर जीवन जवळून पाहून, त्यांच्यापासून जीवन जगण्याची जिद्द घेतील. देशातील सर्व भागातील तरुणांमध्ये मिसळून, त्यांची मने समजावून घेऊन, विचारांची देवाण-घेवाण करून, आपल्या मनाची खोली व प्रगल्भता वाढवतील. केवळ शाब्दिक चर्चेत शक्तिव्यय न करता समाजासाठी काही भरीव क्रिएटिव्ह काम करतील. येथील उबडखाबड भूमीला सुजलाम् सुफलाम् बनविण्यासाठी, ह्या उबडखाबड मनाच्या माणसाला समजण्यासाठी, त्याला आपलेसे करण्यासाठी, संवेदनाक्षम मनाची, विशाल हृदयाची आणि मजबूत खांद्यांची गरज आहे. जातीच्या, भाषेच्या, जुन्या भिंती तोडून फोडून, सुशिक्षित—अशिक्षित, बुद्धिजीवी, श्रमजीवी, शहरवासी—ग्रामवासी ह्या नव्या निर्माण होणाऱ्या भिंतींनाही मुळातूनच उखडून टाकण्यासाठी, निसर्गाने आणि रूढीप्रिय समाजव्यवस्थेने युवक मनाला दिलेले हे आव्हान आहे. आव्हान आहे हे युवकांच्या साहसी प्रवृत्तीला.

[ संपर्क साधा : नॅशनल युथ प्रॉजेक्ट, बुधारा. पोस्ट : अंबाह,
जिल्हा : मोरेना (M. P.) ]

# हे कलकत्ता

सौ. तारा पंडित

## पश्चिम बंगालसंबंधी

सर्वोदयाचे एक नेते श्री. वसंत नारगोलकर हे त्रिवेणी ते कलकत्ता ह्या शांति मोर्चामध्ये सामील झाले होते. त्याच सुमारास पश्चिम बंगालचे बाबतीत त्यांचा एक अभ्यासपूर्ण लेख अमृतबझार पत्रिकेच्या जानेवारी २२ ता. च्या अंकात प्रसिद्ध झाला. त्यात विध्वंसनाच्या मार्गाने देशात आमुलाग्र बदल घडवून आणू इच्छिणाऱ्या लोकांच्या प्रवृत्तीत बदल घडवून आणण्यासाठी अहिंसा हाच एकमेव मार्ग आहे असे त्यांनी म्हटले आहे. परंतु हे विधान मात्र अनेकांना न पटण्यासारखे असे आहे. ह्या लोकांच्या मते गांधीजीचे तत्त्वज्ञान हे जुन्या काळातले असून आजच्या परिस्थितीत ते अंगिकारणे अशक्य आहे. कारण सर्वसाधारण माणसाचे घसरत चाललेले जीवनमान, नेत्यांची पोकळ आश्वासने, जमीन मालकीबाबतचे अपुरे कायदे, बेकारी, कोणताही हेतु साध्य न करणारी शिक्षणपद्धती, आवश्यक वस्तूंच्या किंमती भरमसाट वाढल्यामुळे खालावलेली आर्थिक परिस्थिती इत्यादी अनेक कारणांमुळे बंगाली तरुणाची मानसिक शांति नष्ट झाली असून ते हिंसक कृत्यांकडे वळू लागले आहेत. आर्थिक परिस्थिती ही काही एका दिवसात सुधारण्याची गोष्ट नव्हे. तरी पण ती सुधारण्याचे नवे मार्ग वंगभूमीच्या बुद्धिमान सुपुत्रांचे मदतीने शोधण्यास काय हरकत आहे ? ह्यासाठी तर जास्तीत जास्त लोकांची मते विचारात घ्यावीत. त्याचबरोबर शांतिदलाचे उच्च विचारही अंमलात आणावेत. पदयात्रेबरोबरच दर आठवड्याने एखादी सभा घेऊन त्यात बंगालच्या सद्यःपरिस्थितीबद्दल गंभीर चर्चा व्हावी, असेही काहीजण सुचवितात. अर्थात् ह्या मार्गांनीही विध्वंसनाची कृत्ये करणाऱ्यांना त्या कामापासून तावडतोब परावृत्त करणे कदाचित् शक्य होणार नाही. तरीपण जास्तीत जास्त लोकांवर एकूण चांगला परिणाम होऊ शकला तर विस्कळीत झालेला स्थिरस्थावर होऊन निदान हिंसक कृत्याकडे तरी ते वळणार नाहीत खास असे काही बंगाली तरुणांचे स्पष्ट मत आहे.

## न्यूज्, न्यूज्, न्यूज् !

निवडणुकांची तारीख पुढे ढकलावी व काँग्रेसच्या तीन विभागात (Cong (O), Cong. (R) व Bangla Congress) एकी निर्माण व्हावी ह्या दोन हेतूंनी काँग्रेस ऐक्य परिषदेच्या सभासदांनी गांधीजींच्या पुतळ्याच्या पायथ्याशी बसून उपवास सुरू केला. पहिल्या दिवशी (ता. ५ फेब्रुवारीला) उपवास करणारे एकूण दहा सभासद होते.

शनिवार ता. ६ फेब्रुवारी रोजी प्रधान मंत्री जाहीर सभेत बोलणार आहेत; त्यावेळी त्यांचे भाषण ऐकण्यासाठी झाडावर चढून बसण्याची सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच त्या ज्या मार्गाने जाणार असतील त्या मार्गातील झाडावर देखील चढून बसण्यास बंदी केलेली आहे.

मालडा येथील एका विभागात सी. पी. आय्. व सी. पी. एम्. च्या पुरस्कर्त्यांचे आपापसात बिनसल्यामुळे बाँब फेकण्यापर्यंत मजल गेली व सी. पी. आय्. चा एक अनुयायी जखमी झाला.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे अजय मुखर्जी हे ज्योती बसूंचे प्रतिस्पर्धी म्हणून उभे राहून निवडणूक लढविणार आहेत. गेल्यावेळी दोघे एकत्र येऊन निवडणूक जिंकून विजयी ठरले होते. नंतर मात्र त्यांचे आपापसात खटके उडत तेव्हा त्याबद्दल प्रश्न केला असताना अजय मुखर्जी म्हणाले होते–' आमचे बेबनाव हे पतिपत्निच्या भांडणासारखे आहेत. इतरांनी त्यात लक्ष घालू नये. '

–राजकारण खेळणाऱ्या लोकांच्या बोलण्यात तथ्यांश नसतो की काय ?

आता मुलीदेखील पक्क्या नक्षलवादी होऊ लागल्या आहेत नि भोसकण्यासारखी कृत्ये करण्याइतपत त्यांची मजल गेली आहे ही अत्यंत आश्चर्य करण्यासारखी गोष्ट होय. कृष्णा चौधरी नावाची एक विद्यार्थिनी आपल्या लहान बहिणीसह रस्त्याने जात असताना भर दिवसा काही तरुण मुलींनी तिच्यावर हल्ला केला व तिला तलवारींनी भोसकले. तिला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. हल्लेखोर तरुणींपैकी फक्त एकच पोलिसांच्या हाती सापडू शकली. बंगालमध्ये घडलेली अशा तऱ्हेची ही पहिलीच घटना होय.

## इलेक्शन सीन

निवडणुकांच्या मोहिमेचा एक महत्त्वाचा विशेष म्हणजे सर्वसाधारण माणसाच्या मनावर आलेले भयंकर दडपण आणि त्याचं कारण म्हणजे सतत घडत असलेली तऱ्हेतऱ्हेची अमानुष कृत्ये. पश्चिम बंगालमध्ये खुनाची बातमी ऐकण्यात आता नाविन्य उरलेच नाही. रेडिओच्या कलकत्ता स्टेशनला शहरात किती खून झाले,

किती मारामाऱ्या झाल्या व त्यात किती बळी पडले इत्यादि बातम्या प्रसारीत करण्याची आवश्यकताच भासत नाही. मतपेटींचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच अनेकांचे बळी पडावेत अशा घटनेनुसारच जणू प्रजासत्ताक राज्याचा हा आटापिटा सुरू आहे असे आता गृहीत धरल्यासारखेच आहे. बरे, निवडणुकांचा निकाल जाहीर झाल्यानंतर तरी विजयाचे ढोल सुखासुखी बडवले जातील म्हणता? नावच नको! आता तर हिंसा ही गणतंत्र राज्याचा जणू अविभाज्य विभाग आहे असेच म्हणण्याची वेळ आली आहे. ह्याच्या मुळाशी एक प्रकारची अज्ञात भीती आणि असहाय्यता वास करीत आहे. आपली राजकीय मते सार्वजनिक ठिकाणी लोकांना बोलता येत नाहीत. तोंड बंद ठेवले तरच आपली धडगत आहे, अशी लोकांची खात्री झाली आहे. वास्तविक पाहता निवडणुकीच्या वेळी जनतेला राजकीय बाबतीत जास्त माहिती करून देणे हे वेगवेगळ्या पक्षांचे कर्तव्य आहे. त्याबाबतीत चर्चा आणि विस्तृत विवेचन होईल तरच तो हेतु साध्य होणे शक्य आहे. पण आज नेमके याउलट घडत आहे. निरनिराळे नेते व्यासपीठावरून फक्त भाषणे देतात. लोक ऐकून घेतात आणि शांतपणे घरी निघून जातात. त्यात विशेष रस घेतला आहे किंवा विशेष उत्साह दाखवला आहे असे दिसूनच येत नाही. मतदारांची तर एक ठाम समजूत झालेली आहे ती ही की मत द्यायला जाणे म्हणजे मृत्युच्या खाईतून चालत जाण्याचे दिव्य करणेच आहे !

## खून असे झाले

पुरोगामी पक्षाचे (Forward Block) एक उमेदवार, सीतापति बॅनर्जी यांचा ता. २८ जानेवारी रोजी अमानुष खून करण्यात आला. फक्त ३५ वर्षे वयाचे हे गृहस्थ दुपारचे वेळी स्वतःचे रेशन घेऊन घरी परतत असताना काही अनोळखी तरुणांनी एकदमच यांचेवर हल्ला केला व त्यांना जिवानिशी मारून टाकले.

एक साखरेचे व्यापारी चादर अंगावर पांघरून जात असताना भर दिवसा मारले गेले. काही नवा माल खरेदी करण्यासाठी म्हणून ते जात होते, तोच त्यांचेवर हल्ला झाला. खुनानंतर पोलिस तपासणीचे वेळी त्यांचे खिशात ६४४६ रु. व काही पैसे सापडले, ते त्यांच्या पत्नीच्या स्वाधीन करण्यात आले. हल्लेखोरांनी ह्या माणसाला मारले ते पैशासाठी नव्हे हे यावरून सिद्ध झाले.

कालवे आणि पाटबंधारे विभागाचे मुख्य असिस्टंट श्री. नागेंद्रनाथ सरकार हे बसमधून प्रवास करीत होते. काही अज्ञात तरुणांनी एकदमच बस थांबवली. श्री. सरकार यांना बाहेर ओढून काढले व सुऱ्यांनी भोसकून त्यांचेवर अनेक वार केले. ते गृहस्थ जागच्या जागीच ठार झाले.

श्री. समर रुद्र ह्या सी. पी. एम्. पक्षाच्या एका गृहस्थाचे घरावर रात्रीचे वेळी दहा तरुणांनी हल्ला केला व परिणामतः रुद्रांचा तरुण ड्रायव्हर डोक्यावर जबरदस्त मार लागल्यामुळे ताबडतोब मरण पावला. ह्या माणसाचा काहीही दोष नसताना-सुद्धा त्याला जीवनाला मुकावे लागले. दुर्दैवी बिचारा !

बांसद्रोनी विभागाच्या सी. पी. आय्. ऑफिसमधील असिस्टंट सेक्रेटरी श्री. निताई मुखर्जी कुटुंबियांसह गाढ झोपेत असताना त्यांचेकडे पहाटे साडेपाचला काही सशस्त्र लोक गेले व दार ठोठावू लागले. आम्ही पोलीस असून तुमच्या घराची झडती घ्यायला आलो आहोत असा त्यांनी स्वतःबद्दल खुलासा केला. श्री. मुखर्जींनी दार उघडताच शस्त्रधारी तरुणांनी त्यांना भोसकले व शिवाय बंदुकीच्या गोळयादेखील झाडल्या. त्यांच्या पत्नीलाही बराच मार लागला. दोघांनाही हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. श्री. मुखर्जी त्यानंतर लवकरच मृत्यु पावले.

एक तेवीस वर्षाचा अनोळखी तरूण हावरा येथील श्रीरुपा सिनेमाजवळ सायं-काळी सहाचे सुमारास भोसकून मारला गेला. एक दोन माणसांनी हे दृश्य डोळयांनी पाहिले होते. ते पोलिसांना सांगू लागले की दोन माणसे कुठुन तरी एकदमच उपटली व त्या तरुणाची मानगूट पकडून त्याला मारू लागली तेव्हा तो जोरजोराने ओर-डत होता—'अहो मी काही केलं नाही, मला काहीच माहीत नाही, मला मारू नका हो...' पण त्याचे कोणीच ऐकेना. शेवटी तो तेथल्या तेथेच ठार झाला.

डमडम येथील जयकान्त सिंग नावाचा पोलिस कॉन्स्टेबल हा रस्त्याच्या कडेला असलेल्या एका लहानशा चहाच्या दुकानासमोर उभा राहून चहा पीत असतांना


## अक्षरपद्धति, कुटुंबनियोजन आणि कुटुंबसुयोजन

अनैतिक साधने न वापरता मनोवांच्छित संतती होईल. सुयोजनकरता पाळावयाचे दिवस, महिने, चंद्र वगैरेचा तक्ता उपयोगाचे माहितीसह रु. १०/– व नियोजनाचा तक्ता रु. ५१/– शिवाय त्यावर Astro-Medical उपाय सांगू. याशिवाय वर्षफल रु. १०/– विवाह प्रश्न रु. १०/– व इतर सर्व कामे केली जातील. भेटण्याची वेळ सकाळी ८ ते ११

पं. वि. म. जोशी, ज्योतिष विशारद
"गीताप्रसाद" आऊट हाऊस, कर्वे रोड, पुणे नं. ४.

त्याच्यावर सुरे भोसकून अनेक वार करण्यात आले. त्याला ताबडतोब पोलीस हॉस्पिटलमध्ये नेले परंतु त्याची अवस्था अत्यंत चिंताजनक होती.

## ही गरज पश्चिम बंगालची

पश्चिम बंगालमध्ये निवडणुकांचे वेळी एकूण चार कोटी ऐंशी हजार मतचिठ्ठ्या लागतील असे निवडणूक अधिकारी श्री राघवन् यांनी सांगितले. इतर आवश्यक वस्तुंच्या गरजा येणे प्रमाणे :

२५०० टन कागद

१० लक्ष फॉर्मस्–वेगवेगळ्या ३२ प्रकारचे.

११५०० चिन्हांचे ठसे–वेगवेगळ्या ३३ प्रकारचे.

६० हजार 'स्टँप पॅड्स्'

९२ हजार मतपेट्या.

३५ हजार शाईच्या बाटल्या.

याशिवाय १ लक्ष ७५ हजार स्वयंसेवक— मतदान केंद्रावर काम करण्यासाठी आणि २८ हजार मतदान केंद्रे यांचीही सोय करावी लागेल.

## संरक्षणाचे आश्वासन

संरक्षण खात्याने मतदानाच्या वेळी सर्व प्रकारची मदत देण्याचे कबूल केले असून सैन्याची विभागणी अशा रीतीने होणार आहे की जेणेकरून कोणत्याही ठिकाणी सैनिकांना त्वरीत पोहचता येणे शक्य होईल. शिवाय मतदान झाल्यानंतर देखील काही दिवस लष्करी वर्चस्व राहीलच. मंगळवार ता. ९ फेब्रुवारीपासून कलकत्ता शहरातील रस्त्यांवर लष्करातील लोक ठेवण्यास सुरवात झाली आहे. मतदानाचे वेळी पोलिंग ऑफिसरांनाही मतदान केंद्रापर्यंत नेण्या-आणण्यासाठी सशस्त्र संरक्षण दिले जाईल. शिवाय ते ड्यूटी करीत असतांना देखील त्यांना संरक्षण देण्यात येतील. त्यासाठी मोठ्या प्रमाणात मिलिटरी वर्ग इथे ठेवण्यात आला आहे.

येथील निवडणूक अधिकारी श्री. राघवन् म्हणाले की निवडणुकीच्या कामासाठी कित्येक सरकारी अधिकारी कां कूं करीत आहेत. पण त्या कामासाठी आता त्यांनी ताबडतोब पुढे व्हावे कारण त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी सैन्याने घेतली असून यावेळी त्यांना जादा भत्ता देण्यात येईल.

या जयोनेनुसार पोलीस फोर्सच्या लोकांपैकी एखाद्याला ड्यूटी करीत असताना जीवनाला मुकण्याची पाळी आली तर त्यासाठी नुकसान भरपाई देण्यात येईल. हाच नियम निवडणुकीचे काम करणाऱ्या लोकांनाही लागू करण्यात येणार आहे.

□ □ □

# शास्त्रीजींचा मृत्यु

किरण ठाकूर

नेताजी सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, दीनदयाळ उपाध्याय यांच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी कमिशन नेमण्यात आली. पण विरोधकांनी वारंवार मागणी करूनही केंद्र सरकारने शास्त्रीजींच्या मृत्युची चौकशी करण्याचे नाकारले. रशियात हितसंबध गुंतले असल्याने अशी चौकशी केल्यास ते लोक नाराज होतील अशी भीती राज्यकर्त्यांना वाटत असावी.

पण त्यामुळे ही गोष्ट आता राजकारण बनून गेली आहे. जनसंघाच्या जाहिरनाम्यातच चौकशीचे आश्वासन देण्यात आले आहे.

श्रीमती इंदिरा गांधी यांना निवडणुकीत विरोध करण्यासाठी ललितादेवी शास्त्रींना उभे करावे असाही प्रयत्न झाला म्हणतात.

दिल्लीच्या ' दि स्टेट्स् ' पाक्षिकाने आपल्या अलिकडच्या अंकात या गूढाविषयी मुलाखती प्रसिद्ध करुन पुन: एकदा चर्चेला सुरुवात केली आहे. (या आधी ललितादेवींची मुलाखत ' धर्मयुग 'मध्ये प्रसिद्ध झाली, तेव्हा चौकशीच्या मागणीला जोर आला.)

' दि स्टेट्स् 'मधील लेख, कुलदीप नायर यांच्या ' इंडिया दि : क्रिटिकल इयर्स ' या नव्या पुस्तकातील उल्लेख व जुन्या वर्तमानपत्रातील कात्रणे यावरून हा लेख तयार केला आहे

**त्या दिवशी पहाटे** तीन पर्यंत शास्त्रीजी आधी कोसिजिन, नंतर स्वर्णसिंग, **यशवंतराव** चव्हाण व इतर अधिकारी यांच्याबरोबर चर्चा करीत होते. ताश्कंद

करारावर देशात काय प्रतिक्रिया होईल यावर ती चर्चा होती.

त्या रात्री त्यांना फारच थोडा वेळ झोपता आले.

दिवसाही मंत्री व अधिकारी यांच्याबरोबर चर्चा, रशियन नेत्यांबरोबर बोलणी, ताश्कंद कराराच्या कलमांची डागडुजी, आणि भाषणाची प्रत तयार करणे यात शास्त्रीजी व्यस्त होते. शरीर थकले होते, पण या सर्व गोष्टींपैकी एकही टाळता येणे शक्य नव्हते.

संध्याकाळी युनायटेड न्यूज ऑफ इंडियाचे तेव्हाचे प्रतिनिधी कुलदीप नायर (आता स्टेट्समनच्या दिल्ली आवृत्तीचे संपादक) शास्त्रीजींचे डॉक्टर आर. एन. चुग यांना योगायोगाने भेटले. त्यांनी विचारलं, 'हा सगळा ताण पंतप्रधानांना कितपत सहन होईल ?' चुग आकाशाकडे पहात म्हणाले, 'आता सर्व परमेश्वराच्या हातात '

त्यानंतरच्या घटना नायर सांगतात त्या अशा :

संध्याकाळी रशियाने निरोपादाखल दिलेल्या मेजवानीत मी शास्त्रीजींना पाहिलं. कुणीतरी सांगितलं की ते रावळपिंडीला थांबून पाक अध्यक्ष अयुबखान यांच्या बरोबर चहा घेण्याची शक्यता आहे. मी खात्री करून घेण्यासाठी त्यांना विचारलं तेव्हा ते म्हणाले, 'अजून काही ठरविलं नाही.'

वृत्तसंस्थेचा पत्रकार म्हणून मी शास्त्रींच्या विमानातून प्रवास करणार होतो. काबूलला एक दिवसाचा मुक्काम होता. विमान लवकर निघणार असल्याने मी रात्री ११ वाजताच झोपलो. झोप लागते न लागते तोच कुणीतरी दार ठोठावलं. रशियन सेविका सगळ्या पत्रकारांना उठवून आपल्या भाषेत काहीतरी सांगत होती. कुणाला समजेना पण 'शास्त्री शास्त्री' असं म्हणत ती आकाशाकडे बोट दाखवत होती. तिच्या डोळ्यातून अश्रू वहात होते, तेव्हा काहीतरी अभद्र घडत असल्याची शंका आली. माझा एक सहकारी पत्रकारही धावत आला. मग मी खाली धावत गलो. भारतीय वृत्त अधिकारी (प्रेस अटॅची) तेजा मोटारीत बसताना पाहिले, तो मीही आत उडी मारली.

आम्ही रहात होतो, तेथून शास्त्रींचे निवासस्थान दहा मिनिटाच्याच अंतरावर होते पण तो प्रवासही कधी संपतो की नाही असं वाटत होतं.

पोहोचलो तेव्हा रशियन पंतप्रधान कोसिजिन भेटले. दुःखावेगाने भारून गेले होते. एक शब्दही न बोलता केवळ हाताच्या खुणेने त्यांनी सांगितलं, 'शास्त्री गेले.'

व्हरांड्यातून आत गेले की दिवाणखाना. शास्त्रीजी येथे पाहुण्यांशी बोलत. मी गेलो तेव्हा डॉ. चुग यांना रशियन डॉक्टर्स दुभाष्याच्या मदतीने प्रश्न विचारताना दिसले.

यानंतरच्या खोलीत पंतप्रधानांच्या निजण्याची व्यवस्था होती. भल्या मोठ्या बिछान्यावर बापूजींची छोटीशी मूर्ती चिरविश्रांती घेत पडली होती.

त्यांचे खाजगी सेवक सोडले तर तेथें कोणीही नव्हते. आम्ही बाबूजींच्या पार्थिव देहावर पुष्पांजली अर्पण केली.

बिछान्यापासून दहा फूटावर झाकण नसलेला थर्मास फ्लास्क पडला होता. 'पाणी पिण्यासाठी तो उघडताना बाबूजींना बरीच धडपड करावी लागली असावी' असं मी कुणाजवळ तरी बोलल्याचं आठवतं.

त्यांच्या चपला पलंगाजवळ व्यवस्थित पडल्या होत्या. याचा अर्थ पाणी पिण्यासाठी गेले तेव्हा ते अनवाणीच असावेत.

त्यांच्या सेवकाची खोली तेथून पंधरा यार्डावर होती. पण त्याला बोलाविण्यासाठी घंटी किंवा बझरची व्यवस्था नव्हती, म्हणजे गरज पडली तर त्या खोलीपर्यंत जाऊन त्याला बोलाविण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता.

त्यांचे सेवक व अधिकारी सांगतात त्या हकीकतीप्रमाणे बाबूजी निरोपसमारंभ आटोपून दहा वाजता परतले.

रावळपिंडीला चहा घेण्यासाठी अयुबखानांच्या निमंत्रणाविषयी बाबूजींच्या सहकारी-सेवकांनी ऐकले होते. धास्तावलेल्या काळजीच्या सुरात त्यांनी आग्रह धरला की हे निमंत्रण स्वीकारू नये. पाकिस्तान्यांचे काही सांगता येत नाही.

कुणीतरी भारत पाक युद्धात गुजरातचे मुख्यमंत्री बळवंतराय मेहता यांचे डाकोटा पाकिस्तान्यांनी पाडल्याची आठवण करून दिली.

पण शास्त्री म्हणाले, 'आता समेट झाला आहे. शिवाय अयुब एक भला माणूस आहे.'

मग त्यांनी खाजगी सेवक राम नायला जेवणाचे ताट आणण्यासाठी सांगितले. जेवण रशियन आचारी करून देत असे. त्याच्याबरोबर रशियन गुप्त हेर खात्याच्या दोन महिला-अधिकारी होत्या. शास्त्रीजींना पाण्यासकट काहीही द्यायचे झाले तर त्या आधी चव घेऊन पहात असत. त्या वेळचे रशियातील भारतीय वकील टी. एन. कौल यांचा आचारी महमंद जान हाही स्वयंपाक घरात मदतीस होता. तो इतरांसाठी मांसाहारी पदार्थ करून देत असे. (पुढे पंतप्रधानांच्या मृत्युनंतर त्यांचे कुटुंबीय या महमदला मदतीस घेतल्याबद्दल खूप नाराज झालेले दिसले. पण या आधी १९६५ मध्ये शास्त्रीजी ताश्कंदला गेले, तेव्हा हाच महमद त्यांचे जेवण करून देत असे.)

त्या रात्री मेजवानी झाली असल्याने 'साग,' 'आलू' आणि आमटी, तो देखील नावापुरती, एवढ्यावरच शास्त्रींनी आवरते घेतले.

ते जेवत असतानाच दिल्लीहून फोन आला. शास्त्रींचे एक खाजगी चिटणीस वेंकटरामन ताश्कंद करारावरची भारतातील प्रतिक्रिया सांगत होते. जनसंघाचे अटलबिहारी वाजपेयी आणि प्र. स. चे सुरेंद्रनाथ द्विवेदी यांनी हाजीपिर आणि टिथवाल मधून भारतीय सैन्य काढून घेण्याच्या निर्णयावर टीका केली होती.

शास्त्री म्हणाले, 'विरोधक करारावर टीका करणारच आहेत.'

## हमें अच्छा नही लगा

या प्रतिक्रियेविषयी त्यांना खरोखरच चिंता होती. करारावर सही करताना भारतीय पत्र प्रतिनिधींना ते भेटले तेव्हा इतर काही सांगायच्या आधी ते म्हणाले, 'आता मी तुमच्या हातात आहे. तुम्ही अनुकूल लिहिलं, तरच देश हा करार स्वीकारील.'

शास्त्रीजी दोन दिवस कुटुंबीयांशी बोलले नव्हते, हे लक्षात घेऊन चिटणीसाने विचारलं 'घरी ट्रंककॉल लावू का?'

आधी ते नाही म्हणाले, पण नंतर त्यांचा विचार बदलला. फोन लगेच लागला. ताश्कंदच्या वेळेप्रमाणे अकरा वाजत आले होते.

आधी त्यांचे जावई व्ही. एन्. सिंग त्यांच्याशी थोडावेळ बोलले. मग त्यांची थोरली लाडकी मुलगी कुसुम फोनवर आली.

शास्त्रींनी विचारलं, 'तुमको कैसे लगा?'

ती म्हणाली, 'बाबूजी, हमें अच्छा नही लगा.'

'अम्मा को?' (अम्मा म्हणजे श्रीमती ललिता देवी)

'उनको भी नहीं'

शास्त्री खिन्नपणे पुटपुटले, 'अगर घरवालोंको अच्छा नहीं लगा तो बाहरवाले क्या कहेंगे?'

मग त्यांनी अम्मांना रिसिव्हर द्यायला सांगितलं. पण त्यांना बोलण्याची इच्छा नसल्याचे तिने सांगितले. अनेक वेळा विनंती करूनही अम्मांनी टेलिफोन घेतला नाही.

शेवटी सकाळी दिल्लीतील वर्तमानपत्रे काबूलला पाठवून दे म्हणून त्यांनी मुलीला सांगितलं आणि फोन बंद केला.

## जीवघेण्या येरझारा

या टेलिफोनमुळे बाबूजी बरेच अस्वस्थ झाले. खोलीतल्या खोलीत त्यांनी झपाझप येरझारा घालायला सुरुवात केली, अशा येरझारा घालण्याची त्यांची सवय होती, मुलाखत देतानाही ते असेच फिरत, पण यावेळी या येरझारा संपतात की नाही अशी भीती वाटायला लागली. पूर्वी हृदयविकाराचे दोन झटके येऊन गेलेल्या आणि गेले काही दिवस, विशेषत: ताश्कंदला आल्यानंतर शारीरिक आणि मानसिक ताण पडल्यानंतरच्या येरझारा म्हणजे काळजीची बाब होती.

मध्ये रामनाथने दूध दिले. तेवढे पिऊन झाल्यानंतर पुन: फेऱ्या घालायला सुरुवात झाली. मग त्यांनी पाणी मागितले. मध्यरात्र होऊन गेली होती. त्यांनी रामनाथला झोपायला सांगितले, तुमच्या सोबतीला या खोलीत खाली झोपू का असे रामनाथने विचारलं पण त्यांनी नाही सांगितलं.

एक वाजून वीस मिनिटे (ताश्कंद वेळ) झाली तेव्हा शास्त्रीजींच्या खाजगी चिटणीसांनी सामान बांधणे पुरे केले होते. एवढ्यात त्या खोलीच्या दाराशी शास्त्रीजी दिसले. मोठ्या कष्टानेच ते म्हणाले, ' डॉक्टर साहेब कुठे आहेत ?'

त्याच खोलीत डॉ. चुग झोपले होते. एकानी त्यांना हाक मारली. दोघांनी बाबूजींना सावरत बिछान्यापर्यंत नेले.

रशियन डॉक्टरांनी नंतर निदान केले त्याप्रमाणे मृत्यु मायोकार्डियाक इन्फॅक्शन-मुळ (हृदयाच्या स्नायुंना रक्तपुरवठा होण्यात अडथळा) आला असेल तर हे चालणे शास्त्रीजींना घातक ठरले असावे.

सहाय्यकांपैकी शर्मांनी त्यांना पाणी दिले आणि म्हणाला, ' बाबूजी, आता बरं वाटेल तुम्हाला.'

## मौका तक नही दिया

बाबूजीनी फक्त छातीपाशी हात धरला. त्यांची शुद्ध हरपली होती.

(नंतर दिल्लीत ललिता देवीं शर्मांना म्हणाल्या, ' तू फार नशिबवान आहेस. त्यांना अखेरचा पाण्याचा घोट तू दिलास.')

डॉ. चुग आले. त्यांनी नाडी पाहिली आणि साश्रु डोळ्यांनी म्हणाले ' बाबूजी, आपने मुझको मौका तक नही दिया बचानेको.'

त्यांनी दंडात एक व नंतर हृदयात इंजेक्शन दिले. काही उपयोग होत नाही असे पाहून तोंडातून कृत्रिम श्वासोच्छ्वास करून पाहिला. शेवटी रशियन डॉक्टरला बोलवा म्हणून सांगितलं.

दहा मिनिटात रशियन स्त्री डॉक्टर व पाठोपाठ आणखी काही आले. तोपर्यंत ज्योत विझली होती.

आता मृत्युच्या ' गूढा 'विषयी श्रीमती ललितादेवी शास्त्री, शास्त्रीजीचे नजीकचे मित्र व हल्ली उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री त्रिभुवन नारायणसिंग, मृत्युच्या चौकशीची मागणी करणाऱ्या राष्ट्रीय समितीचे अध्यक्ष डॉ. हृदयनाथ कुंझरु, चिटणीस धर्म यश देव व तज्ञ डॉक्टर यांची मते :

### श्रीमती ललितादेवी

रशियन डॉक्टर म्हणतात शास्त्रीजींच्या मानेवर आम्ही छिद्र अथवा छेद केले नाही. मानेभोवतालच्या भागातून रक्त येत असल्याचेही आमच्या पहाण्यात नाही असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

पण दिल्लीत शव आणले तेव्हा मानेतुन रक्त येत होते हे निश्चित. कारण अंत्यविधी करण्यापूर्वी त्यांना स्नान घातले तेव्हा त्यांच्या मानेतुन रक्त येत होते. मी लगेच पदराने ते पुसून टाकले. पण रक्त बाहेर येणे थांबले नाही.

अजूनही त्यांची रक्ताने माखलेली वस्त्रे माझ्याजवळ आहेत. माझ्या मृत्युनंतर ही वस्त्रे माझ्याबरोबर चितेवर जळतील.

'शास्त्रीजींचे शरीर खूप सुजले होते असे प्रसिद्ध झाले ते खरे का ?'

हो. आंघोळीसाठी त्यांच्या अंगातील कपडे मोठ्या मुष्किलीनेच काढता आले. बंडी तर फाडावीच लागली.

'सरकारी निवेदनात (१८ डिसेंबर १९७०) "शास्त्रींची दैनंदिनी किंवा डायरी लिहित असल्याचे त्यांच्या कुणाही सेवकाने कधीच पाहिले नाही." असे म्हटले आहे ते कितपत खरे ?'

## डायरी कुठे गेली ?

ते महत्त्वाच्या नोंदी आपल्या डायरीत करीत असत. तीत रोज काही ना नोंद असेल अशी मला खात्री आहे. विशेषत: ताश्कंदच्या ऐतिहासिक करारानंतर तर निश्चित काहीतरी लिहिले असेल. ताश्कंदला जाताना विमानतळाच्या वाटेवर त्यांनी कोटातून डायरी काढली आणि त्यात काहीतरी लिहिले. मी विचारलंही, "काय लिहिलं एवढं." तेव्हा ते गमतीच्या स्वरात म्हणाले, "आहे काहीतरी खूप महत्त्वाचं, तुझा त्याचा काही संबंध नाही."

इतकं सर्व मला निश्चित आठवतं म्हणून तर त्यांच्या मृत्युनंतर मी अनेकांजवळ डायरीची विचारणा केली.

## त्रिभुवन नारायण सिंग

शास्त्रीजींच्या मृत्युनंतर जानेवारी १९७० मध्येच मी ललितादेवींशी बोलत होतो, तेव्हा दोन गोष्टी जाणवल्या. एक म्हणजे मृत्युसंबंधी सरकारने जाहीर केलेली वेळ आणि शास्त्री कुटुंबाला आलेल्या फोनची वेळ यामधील तफावत. दुसरी गोष्ट म्हणजे ललितादेवी माझ्याजवळ म्हणाल्या, "त्यांच्या पोटावर छेद कशासाठी केला ? डॉक्टर म्हणतात, शरीर कुजू नये म्हणून रसायन भरण्यासाठी तसे छेद करतात, ही."

मला ते पटले नाही. कारण रसायन अगदी पूर्ण भरायचे असले तरच अपवादात्मक असे पोट कापणे आवश्यक असते असे जाणकार म्हणतात. या ठिकाणी शव व्यवस्थित दिल्लीपर्यंत न्यायचे म्हणजे फक्त काही तासांची बाब होती. शिवाय थोर व्यक्तींचे पोट अनावश्यकपणे कापत नाही. पुन: फॉर्मलिन शरीरात घालण्यासाठी पाठीच्या मणक्याच्या वरच्या भागात मानेजवळ इंजेक्शन देतात. पोटात नाही.

सुरुवातीला मला या गोष्टींची माहिती नव्हती, तेव्हा यात काही गूढ, संशयास्पद असावे असे वाटले नाही. कारण स्वर्णसिंग, चव्हाण यांच्यासारख्या मित्रांनी ते सांगितले असते अशी खात्री होती.

अंत्ययात्रेच्या वेळी काहींनी शवाचा चेहरा निळा पडल्याची कुजबुज केली.

मीही ते पाहिले. त्यानंतर पोटावरील छेद आणि वेळेतील तफावत कानी आली तेव्हा मला काहीतरी काळेबेरे असावे असे पक्के वाटायला लागले.

'चौकशीच्या मागणी मागे काही राजकारण ? विशेषत: इंदिरा गांधींना सतावण्यासाठी ?'

छे, छे, बिलकुल नाही. बाबजींच्या प्रेमामुळेच केवळ ही मागणी. साध्या माणसाच्या मृत्यूचीही चौकशी होते. इथे तर पंतप्रधानांचा मृत्यू आहे. हा प्रश्न मी प्रथम राज्यसभेत मांडला, तेव्हा विरोधकांनीच पाठिंबा द्यायला नाखुषी दाखविली. या मागणीमागे राजकारण आहे असे लोकमत होईल अशी भिती त्यांना होती.

'त्या डायरी आणि थर्मासचे काय ?'

ललिताजी अगदी पहिल्यापासून मला विचारत होत्या. पण एवढ्या प्रचंड धक्क्यामुळे, घाईत त्या वस्तु राहून गेल्या असतील किंवा या थोर माणसाची आठवण म्हणून कुणी ठेवून घेतल्या असतील असेच मी त्यांना प्रत्येक वेळी सांगितले. पण नंतर पोटावरील छेद आणि वेळेतील तफावत या दोन गोष्टींमुळे मलाही संशय येऊ लागला.

कदाचित थर्मास फुटलाही असेल. पण डायरीचे काय ? शास्त्रीजींना डायरी लिहिण्याची सवय होती हे नक्की. आठवण ठेवण्यासाठी म्हणून कुणी ती नेईल ही शक्यता कमी. कारण ताश्कंदच्या निवासस्थानात बंदोबस्त चोख होता.

## धर्म यश देव

मृत्युविषयीचा अहवाल केंद्र सरकारने गेल्या लोकसभेच्या अखेरच्या दिवशी ठेवला, यातच आमचा संशय बळावला. असे करून सरकारने या विषयावर चर्चा करायला संधीच दिली नाही.

एकूण चौदा पंधरा बाबींवर आमचा संशय आधारीत आहे. त्यापैकी दोन-तीन अगदी महत्त्वाचे.

स्वर्णसिंग १९६६ मध्ये म्हणाले त्याप्रमाणे शास्त्रीजींच्या खोलीत बिछान्याजवळ टेलिफोन, बझर किंवा घंटीची व्यवस्था नव्हती. तशी असती तर केवळ बेल दाबून शास्त्रीजींना मदत मागता आली असती.

दुसरे म्हणजे, शास्त्रीजींवर केलेले उपचारही योग्य नव्हते, असे तज्ञांचे म्हणणे आहे.

शिवाय डॉक्टरांच्या दोन वेगवेगळ्या अहवालांनी संशयात भर घातली.

१६-फेब्रुवारी १९६६ रोजी त्यावेळचे परराष्ट्र मंत्री स्वर्णसिंग यांनी सादर केलेल्या अहवालावर डॉ. चुग आणि इतर सहा रशियन डॉक्टरांच्या सह्या आहेत. त्यावर निवासस्थानात सर्वात आधी आलेल्या रशियन महिला डॉक्टर इ. जी. येरे-

मॅको यांची सही का नाही ? तेव्हाचे गृहमंत्री चव्हाण यांनी पार्लमेंटमध्ये ४ एप्रिल १९७० रोजी उत्तर दिले, "त्यांनी तशी सही करावी असे आमच्यापैकी कुणालाच सुचविता आले नसते. त्यांनी सहीला नकार दिला असे म्हणणे बरोबर नाही. त्यांच्यापेक्षा वरिष्ठ रशियन अधिकारी तेथे होते त्यामुळे त्यांनी सही केली नाही."

## एकाच अहवालाच्या दोन प्रती ?

याच दिवशी राज्यसभेत चर्चेच्या वेळी चव्हाण यांनी सांगितले, "डॉ. चुग व सहा रशियन डॉक्टरांनी सादर केलेल्या अहवालाखेरीज दुसऱ्या अहवालाची आम्हाला कल्पना नाही. एकाच अहवालाच्या दोन प्रतींवर सर्व डॉक्टरांनी (चुग आणि सहा रशियन) सह्या केल्या एवढीच आम्हाला माहिती आहे."

पण १८ डिसेंबर १९७० रोजी पार्लमेंटसमोर ठेवलेल्या अहवालात आणखी वेगळा उल्लेख आहे, "डॉक्टरांचा अहवाल आधी रशियन भाषेत करण्यात आला. त्यात डॉ. चुग आणि आठ (सहा नव्हे) रशियन डॉक्टरांच्या सह्या आहेत. या अहवालाचे नंतर इंग्रजीत भाषांतर भारतीय दुभाष्याद्वारे करून त्यावरही डॉ. चुग आणि सहा (आठ नव्हे) रशियनांच्या सह्या घेण्यात आल्या."

या फरकाखेरीज शास्त्रीजींच्या हृदयात टोचलेल्या औषधांच्या नावातही फरक आहे. एकात त्याचे नाव कॅल्शियम क्लोराईड तर दुसऱ्यात पोटॅशियम क्लोराईड असा उल्लेख आहे.

शिवाय आधी रशियन अहवाल तयार झाला असे वाटत नाही. कारण इंग्रजी अहवालात डॉ. चुग यांनी चार पाच ठिकाणी दुरुस्त्या करून संक्षिप्त स्वाक्षरी केली आहे. रशियन अहवालात असे काहीही नाही, त्यामुळे ते भाषांतर असावे असे वाटते.

(१) शास्त्रीजींचा श्वास शेवटच्या घटकेला कोंडला होता आणि ते श्वासासाठी धडपडत होते, असे अहवालात म्हटले आहे. खोलीत ऑक्सिजनसह सर्व वैद्यकीय व्यवस्था होती तर मग ऑक्सिजन देणे ही पहिली गरज होती.

(२) डॉ. चुग यांनी नाडी पाहिली तेव्हा ती अति जलद आणि क्षीण होती रक्तदाब मोजता आला नाही. हृदयाचे ठोके अगदी मंदपणे ऐकू येत होते. डॉ. चुग. यांनी मेफ्येंटिन आणि निकोटेनाचे एक इंजेक्शन दंडाच्या स्नायुत (इंट्रा मस्क्युलर) दिले असे अहवाल सांगतो.

हृदय बंद पडण्याच्या वेळी इंट्रा मस्क्युलर इंजेक्शनचा उपयोग होत नाही. ते नसेत (इंट्रा व्हेनस) द्यावे लागते.

हृदयाचे ठोके ऐकू येईनासे झाल्यानंतर पोटॅशियम क्लोराईडचे इंजेक्शन हृदयाखाली डाव्या बाजूला देण्यात आले, असे अहवालात म्हटले आहे.

दुभाष्याने भाषांतर करताना पोटॅशियम–कॅल्शियमची गल्लत केली कारण रशियन भाषेत या दोन शब्दांचे प्रतिशब्द अगदी सारखे आहेत असे स्पष्टीकरण देण्यात आले. प्रश्न असा आहे : यापैकी कोणते औषध योग्य ?

दोन्ही रसायनांची हृदयावरील क्रिया एकदम विरोधी आहे. कॅल्शियम क्लोराईड मुळे हृदयाला ताकद मिळून ठोके चालू रहातात तर पॉटेशियम क्लोराईडमुळे ते मऊ होऊन ठोके क्षीण होऊ लागतात. त्यामुळे पोटॅशियम क्लोराईडचा उपयोग या ठिकाणी अनिष्ट होता.

## शरीरावरचे निळे डाग

(४) शास्त्रीजींच्या शवावर निळे डाग पडल्याचे अनेकांनी बोलून दाखविले. रशियन डॉक्टर म्हणतात, " शव सुरक्षित ठेवण्यासाठी रसायन घातल्यानंतर असा रंग येणे अस्वाभाविक नाही.

हृदयविकाराने मरण पावलेल्या व्यक्तीचे शव निळे पडते, हे खरे पण रशियन डॉक्टरांचे वरील स्पष्टीकरण पटत नाही. रसायन भरल्यामुळे शव निळे पडत नाही फक्त अधिक तेलकट व फिक्कट दिसते.

(५) शास्त्रीजींचे शव सुजल्याचे ललितादेवी म्हणतात. या रसायनामुळे तसे होते का ?

हे रसायन रक्त वाहिनीत योग्य प्रकारे घातल्यास अशी सुज येत नाही. हे रसायन बॅक्टेरियांचा नाश करते. त्यामुळे कुजणे किंवा सुजणे या क्रिया होत नाहीत.

त्यामुळे या बाबतीत दोनच गोष्टी संभवतात. (१) रसायन टोचलेच नसेल किंवा (२) ते योग्य प्रकारे टोचले नसेल.

(६) शेवटी मानेजवळच्या छिद्रासंबधी : असे छिद्र केले नसल्याचे अहवालात म्हटले आहे. ललिता देवी ठामपणे सांगतात की तसे छिद्र होते.

समजा तसे असले तर त्यामागचे कारण काय ?

हृदयविकार असलेल्यांच्या बाबतीत अशा छिद्राचा काहीही उपयोग नाही. मेंदूत रक्त द्रावाचा संशय असेल तर साधारणपणे पाठीच्या कण्याच्या खालच्या अंगाला सुईने भोक पाडतात (वरच्या मानेजवळच्या नव्हे) यातून मेंदूतील द्रव बाहेर पडावा अशी योजना असते. मेंदूत रक्तस्त्रावाची डॉक्टरांना शक्यता वाटली का ? समजा, वाटली असली तरी ज्या ठिकाणी छिद्र पाडले ती जागा आणि दिल्लीत आल्यानंतरही होणारा रक्तस्त्राव या गोष्टी अस्वाभाविक वाटतात. पुन: पाठीच्या कण्याचा वरचा भाग कवटीच्या खालच्या भागात मिळतो ती जागा अतिशय नाजुक असते. या ठिकाणी जखम झाल्यास किंवा छिद्र पाडल्यास एकदम कोसळण्याची शक्यता असते.

□ □ □

# पराजित - अपराजित



वि. स. वाळिंबे : उत्तरार्ध : लेखांक पाच

द गॉलला हवा असलेला क्षण जवळ येत चालला होता.

६ जून १९४४ या दिवशी उजाडायच्या सुमाराला अँग्लो-अमेरिकन सेनेची आघाडीची पथके नॉर्मंडीमध्ये उतरली. जर्मनीविरुद्ध फ्रान्समध्ये दुसरी आघाडी उघडण्यासाठी स्टॅलिनने चर्चिल आणि आयसेनहॉवर यांच्याकडे गेले कितीतरी दिवस तगादा लावला होता. परंतु उत्तर आफ्रिकेमध्ये आपल्या सैन्य-शस्त्रबळाच्या आधारावर अँग्लो-अमेरिकन सेनेची दमछाक करीत असलेल्या जर्मन सैन्याचा पुरता निचरा केल्याशिवाय फ्रान्समध्ये दुसरी आघाडी उघडणे श्रेयस्कर ठरणार नाही हे ओळखून ब्रिटन-अमेरिकेने आतापर्यंत स्टॅलिनच्या मागणीकडे दुर्लक्ष केले होते. १९४४ च्या प्रारंभी उत्तर आफ्रिकेमध्ये अँग्लो-अमेरिकन सेनेला निर्णायक विजय मिळाला आणि त्यानंतर 'दुसऱ्या आघाडी'चा मुहूर्त निश्चित करण्यात आला.

अँग्लो-अमेरिकन सेनापथके नॉमंडीच्या किनारपट्टीवर उतरू लागली आणि फ्रान्सच्या मुक्तिसंग्रामाला प्रारंभ झाला.

द गॉल याच क्षणाची वाट पहात होता.

सहा जूनचा सारा दिवस द गॉलने लंडनमधील आपल्या कचेरीत बसून व्यतीत केला. सायंकाळी सहा वाजता तो बी. बी. सी.च्या कचेरीत गेला आणि आपल्या देशबांधवांना उद्देशून म्हणाला, "फ्रान्सच्या सुपुत्रांनो, तुम्ही कुठंही असा, कोणतंही काम करीत असा, पण आज तुमचं एकच कर्तव्य आहे. तुमच्याजवळ जे साधन असेल त्या साधनानिशी तुम्ही शत्रूला आपल्या भूमीवरून हुसकावून लावण्यासाठी एकत्र आलं पाहिजे."

द गॉलचा हा हस्तक्षेप, अँग्लो-अमेरिकनांच्या युरोपीय विभागाचा प्रमुख आयझेनहॉवर याला आवडणे शक्यच नव्हते. अँग्लो-अमेरिकन सेना जर्मनांच्या वर्चस्वाखालून फ्रान्सची मुक्तता करीत असताना फ्रेंच नागरिकांनी शांत रहावे असे आवाहन अमेरिकेने केले होते. या आवाहनामागील धोका द गॉलला उमगला. फ्रान्समध्ये अँग्लो-अमेरिकन सेनेची घोडदौड सुरू असताना, फ्रेंच नागरिक स्वस्थ बसले तर या मुक्ततेचे श्रेय आपल्या हंगामी सरकारला मिळणार नाही हे ओळखून द गॉलने आपल्या या भाषणात म्हटले होते—'फ्रेंच नागरिकांनी फ्रेंच सरकारचे आणि या सरकारने नेमलेल्या अधिकाऱ्यांचे आदेश पाळले पाहिजेत.'

फ्रान्समधील स्थानिक प्रतिकार-समित्यांनी उठाव करावा हे सुचविण्यासाठी द गॉलचा तोच हेतू होता. फ्रान्सच्या श्रेयात ब्रिटन-अमेरिकेला सहभागी होऊ देता कामा नये यासाठी त्याची ही सारी धडपड सुरू होती.

अँग्लो-अमेरिकन सेनापथके नॉमंडीमध्ये उतरली तेव्हा व्हिशी येथील पेतां सरकार अस्तित्वात असले तरी या सरकारमध्ये त्राण मुळीच उरले नव्हते. जर्मन सेनानींच्या हुकुमानुसार वागणे एवढेच या सरकारचे स्वरूप उरले होते. त्यामुळे नॉर्मंडीमध्ये आयसेनहॉवरची सेना उतरताच आपल्या सरकारचा शेवट जवळ आलेला आहे हे पेतां याला कळून चुकले. त्यामुळे जर्मनीला पळून जाण्याची त्याने तयारी आरंभिली.

द गॉलला निराळीच भीती वाटत होती.

पेतां सरकार बदनाम झालेले असले तरी व्यक्तिश: पेतांची लोकप्रियता ओसरली नाही हे द गॉलला माहित होते. त्यामुळे कदाचित् आयसेनहॉवर पॅरिस ताब्यात येताच पेतां याला पॅरिसला बोलावून घेईल या शंकेने तो बेचैन झाला होता. कदाचित् महायुद्धाची समाप्ती होईपर्यंत आयसेनहॉवर फ्रान्स अँग्लो-अमेरिकन लष्कराच्या ताब्यात ठेवण्याची योजना पुढे करील असेही त्याला वाटे. आणखी एक शक्यताही द गॉलला डोळयाआड करता येत नव्हती. १९४० मध्ये अस्तंगत झालेल्या तिसऱ्या प्रजासत्ताकाच्या पुनरुज्जीवनाची कल्पना चर्चिल आणि

रूझवेल्ट यांच्या डोक्यात घोळत असेल तर मग आपला सारा खटाटोप वाया जाईल असेही द गॉलच्या मनात येई.

विमुक्त फ्रान्सला आपल्या मनाप्रमाणे आकार देण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या या नेत्याच्या डोळ्यापुढे आणखी एक भीती तरळत होती. फ्रान्समधील अंतर्गत प्रतिकार-मोहिमेमध्ये अग्रभागी असलेल्या कम्युनिस्टांनी तातडी करून पॅरिस ताब्यात घेतले तर द गॉलच्या साऱ्याच स्वप्नांचा चक्काचूर होणार होता.

तसे होऊ नये म्हणून द गॉलने निराळाच मार्ग अनुसरला.

पोलंड, बेल्जम, युगोस्लाव्हिया, नॉर्वे आणि चेकोस्लोव्हाकिया या देशांची निर्वासित सरकारे त्यावेळी लंडनमध्ये होती. आठ जून ते वीस जून या बारा दिवसांच्या अवधीत, द गॉलने या सरकारांकडून आपल्या 'स्वतंत्र फ्रेंच समिती'ला फ्रान्सचे हंगामी सरकार म्हणून मान्यता मिळविली.

द गॉलने एकीकडे परराष्ट्रांची मान्यता मिळविण्याचे कार्य सुरू असतानाच त्याला फ्रान्समधील ताज्या घडामोडींकडे बारीक लक्ष ठेवावे लागत होते. तेरा जूनला तो स्वतः नॉर्मंडीमध्ये येऊन गेला. त्यावेळी तेथल्या बायो शहरामध्ये बरेच लोक द गॉलभोवती गोळा झाले. ही संधी साधून त्याने आपल्याबरोबर आलेल्या कोलेत याची हंगामी फ्रेंच सरकारचा नॉर्मंडीतील प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली. द गॉलची ही नॉर्मंडी-भेट बरीच उपयुक्त ठरली. कारण तेथल्या अधिकारी वर्गाने निरनिराळ्या सरकारी कचेऱ्यांमध्ये लटकलेली पेतांची छायाचित्रे काढून टाकून आणि द गॉलला आपला नेता मानीत असल्याचे जाहीर केले.

बायो शहरामध्ये फेरफटका मारल्यानंतर द गॉल लंडनला परतला.

त्याच्या कचेरीमध्ये रूझवेल्टचे पत्र येऊन पडले होते. द गॉलने आपल्याशी चर्चा करण्यासाठी वॉशिंग्टनला यावे असे रूझवेल्टने त्या पत्रात म्हटले होते. युरोपमधील महायुद्ध संपेपर्यंत आपण फ्रान्समध्ये जाण्याची आणि तेथे सरकार स्थापन करण्याची घाई करू नये असा आपल्याला आग्रह करण्यासाठीच बहुधा रूझवेल्टने हे निमंत्रण धाडले असावे असे द गॉलच्या मनाने घेतले आणि म्हणून त्याने त्या पत्राला उत्तर धाडले नाही.

हंगामी फ्रेंच सरकारची राजधानी त्यावेळी अल्जियर्स येथे होती. त्यामुळे द गॉल प्रथम अल्जियर्स येथे गेला आणि पॅरिस मुक्त व्हायच्या सुमाराला आपण पॅरिसमध्ये कसे पोचायचे यासंबंधी त्याने आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा केली. अल्जियर्सहून ही स्वारी रोमला गेली. व्हॅटिकनमध्ये त्याची आणि पोपची प्रदीर्घ मुलाखत झाली. आपल्या प्रयत्नांना पोपचा पाठिंबा आहे हे दर्शविण्यासाठी द गॉलला या भेटीचा खूपच उपयोग झाला.

एवढ्यात त्याला ईडनकडून निरोप आला—'रूझवेल्ट तुला भेटायला उत्सुक आहे.' त्यामुळे लंडनला परतताच द गॉलने अमेरिकेकडे प्रयाण केले. रूझवेल्ट

त्याला म्हणाला, "युद्धोत्तर जगाचा कारभार अमेरिका, ब्रिटन, रशिया आणि चीन या चार बड्या राष्ट्रांच्या मार्गदर्शनानुसार चालावा अशी माझी इच्छा आहे."

अमेरिकन अध्यक्षाचे हे मनोगत कळताच द गॉलला आश्चर्याचा धक्का बसला. रूझवेल्टच्या योजनेनुसार पश्चिम युरोप अमेरिकेच्या कक्षेखाली येणार होता. म्हणजे जर का ही योजना अमलात आली तर आपल्याला अमेरिकेच्या तंत्राने वागावे लागेल हे द गॉलला जाणवले. तो काहीच बोलला नाही. त्याने आपल्या मनाला बजावले– 'राष्ट्राराष्ट्रांच्या व्यवहारामध्ये तर्कशास्त्र किंवा भावना यांना मुळीच स्थान नसते. सत्ता मिळविणे आणि राबविणे या एकाच सूत्राभोवती आंतरराष्ट्रीय व्यवहार फिरत असतात हेच खरे."

द गॉल गप्प बसल्याचे पाहून रूझवेल्ट म्हणाला, "या योजनेबाबत फ्रान्सला भिण्याचं कारण नाही. कारण फ्रान्सचा कारभार फ्रेंच जनतेच्या मनानुसार चालणार आहे."

एवढ्या आश्वासनावर द गॉलचे समाधान होणार नाही हे रूझवेल्टला माहित होते. म्हणून बारा जुलैला अमेरिकेने जाहीर केले– 'फ्रान्सचे प्रशासन राष्ट्रीय मुक्ती समितीकडेच सोपवायला हवे हे आम्हाला तत्वतः मान्य आहे.'

अमेरिकेप्रमाणे ब्रिटननेही अशी ग्वाही द्यायला हवी अशी द गॉलची अपेक्षा होती. पश्चिम युरोपमधून जर्मन सैन्याला हाकलून लावावयाचे असेल तर फ्रान्समधील संघर्ष लवकर आटोपणे जरुरीचे होते आणि त्यासाठी द गॉलला दुखवून चालण्यासारखे नव्हते. म्हणून ऑगस्टच्या प्रारंभी रूझवेल्ट, चर्चिल आणि द गॉल यांच्या सह्यांनी काढलेल्या पत्रकात म्हटले होते– 'फ्रान्समधील कारभाराबाबत हंगामी फ्रेंच सरकारला सर्वाधिकार देण्यात येत असून या सरकारने अँग्लो-अमेरिकन सेनेला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिलेले आहे.'

द गॉलच्या दृष्टीने ही मोठीच कमाई होती. लागलीच त्याने आपल्या देशबांधवांना आवाहन केले– "फ्रान्सच्या मुक्ततेची लढाई आता जोराने सुरू होऊ द्या. लढाईतून स्वतंत्र फ्रान्स जन्माला येणार आहे."

हंगामी फ्रेंच सरकारचा प्रमुख या नात्याने वीस ऑगस्टला द गॉल नॉर्मंडीमध्ये येऊन धडकला. यावेळी जनरल लेक्लेर्कचे सेनादल नॉर्मंडीतील शेते तुडवीत पॅरिसकडे निघाले होते. दुसऱ्या बाजूने अमेरिकन सैनिकांनी पॅरिसचे प्रवेशद्वार गाठले होते. पॅरिसमधल्या जर्मन सेनेची कोंडी झाली होती. ही बातमी कळताच संतापलेल्या हिटलरने पॅरिसमधला आपला वरिष्ठ सेनाधिकारी जनरल फॉन शोल्टिट्झला हुकूम धाडला– 'पॅरिस जाळून टाक.'

परंतु पॅरिससारखी रम्य नगरी बेचिराख करून टाकावी ही हिटलरची आवेशी इच्छा शोल्टिट्झला मान्य नव्हती. शेवटपर्यंत लढायचे एवढेच त्याने आपल्या मनाशी ठरविले होते. तेवीस ऑगस्टला पॅरिसमधील जर्मन प्रतिकार संपुष्टात आला.

पॅरिसमध्ये विजेत्याच्या रुबाबात प्रवेश करण्याचा मान लेक्लेर्कच्या सैन्याला मिळाला पाहिजे ही द गॉलची सूचना आयसेन हॉवरने स्वीकारली. त्याप्रमाणे पंचवीस ऑगस्टला, शोल्टिट्झ याने जनरल लेक्लेर्कने पुढे केलेल्या शरणागतीच्या कागदावर सही केली.

चार वर्षे, दोन महिने पंधरा दिवस एवढ्या कालावधीनंतर द गॉलने पॅरिस-मध्ये पुनश्च प्रवेश केला.

त्याच्या जीवनातील हा सुवर्णक्षण होता.

ब्रिटन आणि अमेरिका यांच्या मदतीमुळे हा क्षण उगवला होता हे खरे आहे. पण त्याचबरोबर हेही खरे आहे की फ्रान्समधील इतर कोणाही नेत्यापेक्षा हा क्षण साकार व्हावा यासाठी एकटा द गॉलच आसुसला होता, धडपडत होता. 'फ्रान्स लढाई हरला असला तरी तो संपलेला नाही, संपणारही नाही.' अशी १८ जून १९४० रोजी द गॉलने बी. बी. सी. वरून घोषणा केली त्यावेळी तो अक्षरशः एकाकी होता. त्यावेळी त्याची ही घोषणा म्हणजे बऱ्याच जणांना एका अहंकारी माणसाची वेडगळ वल्गना वाटत होती. चार वर्षांच्या अविरत परिश्रमानंतर त्या घोषणेला एका द्रष्टयाच्या संजीवक मंत्राची प्रतिष्ठा लाभली होती.

पण एवढ्यावर भागण्यासारखे नव्हते.

'मी म्हणजे फ्रान्स आहे.' ही प्रतिज्ञा त्याला खरी करून दाखवायची होती. म्हणून तो थेट सॅन्त दोमिनिक रस्त्यावरील युद्धखात्याच्या कचेरीमध्ये गेला. यावेळी पॅरिस मुक्ती समितीच्या कार्यकर्त्यांची हॉटेल द व्हिले येथे बैठक सुरू आहे हे त्यास माहित नव्हते असे नाही. परंतु या समितीची आपल्यावर हुकमत चालता कामा नये, कोणाच्या तरी मेहेरबानीचे आपल्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब होऊ नये म्हणून त्याने हा मार्ग अवलंबिला होता. युद्धखात्याच्या कचेरीमध्ये आल्यानंतर द गॉलच्या मनाला खूप बरे वाटले. रेनॉच्या मंत्रिमंडळातील उपपरराष्ट्रमंत्री म्हणून तो येथेच काही काळ वावरला होता आणि येथूनच त्याने १० जून १९४० रोजी लंडनला प्रयाण केले होते. युद्धखात्याची कचेरी न्याहाळताना द गॉल स्वतःशी पुटपुटला— " या कचेरीचं पूर्वीचं सारं वैभव तसंच आहे. फक्त सरकार तेवढे अस्तित्वात नाही. ते मला निर्माण करायचं आहे आणि म्हणून मी इथंच राहणार आहे."

आपल्या कचेरीच्या खिडकीपाशी उभा राहून द गॉल बाहेर पहात होता. पॅरिस-मधील परिचित वास्तुंवरून त्याची नजर भिरभिरत होती.

एवढ्यात पारोदी तेथे धावतधावत आला आणि म्हणाला, " हॉटेल द व्हिल-मध्ये लोक आपली वाट पहाताहेत."

द गॉल त्या अनोळखी माणसाकडे पाहू लागला. द गॉलने विचारलं, " तू पारोदी का ?"

" होय."

पारोदी हा गेले काही दिवस द गॉलचा फ्रान्समधील प्रतिनिधी म्हणून काम पहात असला तरी त्या दोघांची आतापर्यंत भेट झालेली नव्हती. त्यामुळे पारोदीचा अशी अनपेक्षित भेट झाल्यामुळे द गॉलला बरे वाटले. पारोदीकडून त्याला पॅरिसमधील परिस्थितीचा तपशील कळू शकला.

पारोदीने आठवण करून दिली, "आपल्याला हॉटेल द व्हिल इथं जायचं आहे ना?"

"ते लोक थांबू शकतील." द गॉल उत्तरला.

द गॉल प्रथम पोलिसप्रमुखांच्या कचेरीमध्ये गेला. कारण पॅरिसच्या मुक्ती-लढ्यात इतर कोणाहीपेक्षा पोलिसांचा वाटा मोठा होता. तेथून तो हॉटेल द व्हिल येथे आला. द गॉलने प्रथम पालीस-कचेरीला भेट द्यावी आणि नंतर इकडे यावे ही गोष्ट राष्ट्रीय प्रतिकार समितीचा जॉर्ज बिदॉल्ज याला आवडली नाही परंतु आताच त्यासंबंधी नापसती व्यक्त करणे त्याला इष्ट वाटले नाही. बिदॉल्जशेजारी मारान हा कम्युनिस्ट कार्यकर्ता उभा होता. त्यामुळे द गॉल म्हणाला, "पॅरिसच्या जनतेनं पॅरिस स्वतंत्र केलं आहे असं मी मानतो."

पॅरिसच्या आणि पर्यायाने फ्रान्सच्या मुक्ततेचे श्रेय आपल्याकडे घ्यायला कम्युनिस्ट धडपडत आहेत हे बिदॉल्ज याला माहित असल्यामुळे तो द गॉलला म्हणाला, "आपण आताच इथं प्रजासत्ताकाची घोषणा करावी."

बिदॉल्जच्या बोलण्यातला रोख द गॉलच्या ध्यानात आला. त्यामुळे तो म्हणाला, "प्रजासत्ताक अस्तित्वात नाही असं तुला कोणी सांगितलं? व्हिशी सरकारला कधीच काही किंमत नव्हती. फ्रेंच प्रजासत्ताकाचा मी अध्यक्ष असताना मुद्दाम घोषणा करण्याची काय जरूरी आहे?"

द गॉल पॅरिसमध्ये येऊन पोचला आहे हे कळताच त्या शहरातील नागरिकांच्या उत्साहाला उधाण आले. द गॉलच्या दर्शनासाठी युद्धखात्याच्या कचेरीभोवती लोकांचे थवे गोळा होऊ लागले. लोकांच्या अभिवादनाचा स्वीकार करता यावा म्हणून सव्वीस ऑगस्टला द गॉलने आर्क द त्रायंफपासून नोत्रदाम चर्चपर्यंत मिरवणूक काढली. या मिरवणुकीच्या अग्रभागी जनरल लेक्लेर्क होता आणि त्याच्या पाठीमागे त्याचे सोळा हजार सैनिक लष्करी संचलन करीत चालले होते. त्यापाठोपाठ द गॉल उघड्या मोटारीतून दोन्ही बाजूला दाटीवाटीने उभ्या असलेल्या नागरिकांच्या जयजयकाराचा हात उंचावून स्वीकार करीत होता.

पहिले महायुद्ध संपले तेव्हा पॅरिसमध्ये अशीच मिरवणूक निघाली होती आणि त्यावेळी क्लेमेन्सो अशीच मानवंदना स्वीकारीत होता. ते सारे दृश्य पाहून क्लेमेन्सो सद्गदित होऊन म्हणाला होता, "मला या क्षणी मरण आलं तर किती बरं होईल!"

द गॉलच्या मनात हा विचार आला नाही. त्याच्या स्वभावाशी तसा विचार

येणे विसंगत होते. पॅरिसमधील नागरिकांच्या स्वागताचा स्वीकार करीत असताना त्याच्या मनात फ्रान्सच्या इतिहासाचा, जगाच्या राजकारणातील फ्रान्सचे स्थान आणि फ्रान्सच्या इतिहासातील आपले स्वतःचे स्थान याचाच विचार येत होता.

ही मिरवणूक काढण्यात आपण केवढा धोका पत्करीत आहोत हे त्याला माहित नव्हते असे नाही. कारण पॅरिसपासून अवघ्या पन्नास मैलांवर जनरल स्पिडेल उभा होता आणि पॅरिसवर 'व्ही–एक' आणि 'व्ही–दोन' या नव्याने तयार करण्यात आलेल्या अग्निबाणांचा पाऊस पाडण्याचा हिटलरने त्याला हुकूम दिलेला होता. जनरल गेरो या अमेरिकन सेनानीला हिटलरच्या या हुकुमाचा सुगावा लागला होता आणि म्हणून तो द गॉलला म्हणाला होता, 'मिरवणूक काढण्याची आजच घाई करायचं कारण नाही. कदाचित या मिरवणुकीमुळे चिडून जाऊन स्पिडल अग्निबाणांचा हल्ला करायचा."

परंतु द गॉलला लोकमताची नाडी अचूक माहित होती. तो म्हणाला मिरवणूक आजच काढायला हवी. उद्या लोक एवढ्या गर्दीनं जमतील असा भरवसा देता येत नाही. फ्रान्सचं ऐक्य अभंग राखण्यासाठी हे लष्करी संचलन आवश्यक आहे "

अठ्ठावीस ऑगस्टला द गॉलने एक खास हुकूम काढून राष्ट्रीय प्रतिकार समिती आणि पॅरिस मुक्ती समिती यांचे कार्य संपले असल्याने नाही केदरे आणि या समित्यांच्या कार्यकर्त्यांनी प्रशासन-यंत्रणेमध्ये किंवा लष्करामध्ये दाखल होऊन पॅरिसचा नवा लष्करी गव्हर्नर जनरल कोएनिग याचे आदेश पाळण्याचे आवाहन केले.

जनरल द गॉलकडे पॅरिसची सूत्रे आले त्यावेळी देशातील आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट झालेली होती. औद्योगिक उत्पादन फार मोठ्याप्रमाणावर खंडित झालेले होते. हिटलरच्या अधिकाऱ्यांनी नोटा छापण्याची टांकसाळच उघडली होती. त्यामुळे चलन फुगवटा होऊन जीवनावश्यक वस्तूंच्या किमती बेसुमार वाढल्या होत्या. पॅरिसमधून बाहेर पडण्यापूर्वी जर्मन सैनिकांनी सिएन नदीवरचे पूल उद्ध्वस्त करून टाकलेले असल्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली आणि पॅरिसला उपासमार जाणवू लागली.

या साऱ्या अंतर्गत अडचणी दूर करता याव्यात म्हणून द गॉलने सप्टेंबरच्या प्रारंभी राष्ट्रीय सरकार स्थापन केले महायुद्ध संपेपर्यंत आपापसांत कलह होऊ नये म्हणून त्याने आपल्या मंत्रिमंडळांत समाजवादी आणि कम्युनिस्ट पक्षांच्या सदस्यांचाही समावेश केला. फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाचा सहकार्यवाह मॉरिस थोरेझ नुकताच मॉस्कोहून पॅरिसला परतला होता. द गॉलने त्याला उपप्रधान मंत्रीपद दिले. अर्थखात्याची सूत्रे पिएर मेंडेस फ्रान्स याच्याकडे सोपविली.

द गॉल पुढे अक्षरशः कामाचा डोंगर पडला होता. आणि अल्जीयर्समधून पॅरिसला आलेल्या हंगामी सरकारची पुनर्घटना करणे व या सरकारला ब्रिटन, अमेरिका, रशिया आदी राष्ट्रांची मान्यता मिळविणे, फ्रान्समर विखुरलेल्या प्रतिकार समित्या विसर्जित करणे आणि जर्मनीविरुद्ध लढण्यासाठी फ्रेंच सेनेची जुळवाजुळव

करणे अशी कितीतरी तातडीची कामे खोळंबून राहिली होती. ऑक्टोबरच्या अखेरीला ब्रिटन आणि अमेरिका यानी द गॉलच्या हंगामी सरकारला मान्यता दिल्यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न सुटल्याचा द गॉलने निःश्वास टाकला. परंतु केवळ कोरडी मान्यता देऊन ब्रिटिश आणि अमेरिकन नेते स्वस्थ बसले. द गॉलच्या सैन्याला शस्त्रास्त्रांची मदत करायला त्यांची तयारी नव्हती. म्हणून डिसेंबरमध्ये द गॉल मॉस्कोला गेला. ब्रिटन आणि अमेरिका यांच्याकडून आपल्याला लष्करी साहित्याची मदत होत नाही ही तक्रार त्याने स्टॅलिनच्या कानावर घातली.

स्टॅलिन त्याचे बोलणे शांतपणे ऐकत होता. मात्र रशियाच्या वतीने निश्चित आश्वासन द्यायला तो टाळाटाळ करीत होता. रशिया आणि फ्रान्स यांचे हितसंबंध परस्परांशी कसे निगडित आहेत हे स्टॅलिनला पटवून देण्यासाठी द गॉल म्हणाला, "युरोप खंडाशी ब्रिटन आणि अमेरिका यांचा तसा निकटचा संबंध नाही. त्यामुळे युद्ध संपल्यानंतर ते जर्मनीबाबत कोणते धोरण स्वीकारतील हे सांगता येत नाही. जर्मनीचा प्रश्न रशिया आणि फ्रान्स यांच्या दृष्टीनं फार महत्त्वाचा आहे. म्हणून जर्मनीबाबत फ्रान्स आणि रशिया यांनी वेगळा करार करावा."

फ्रान्सची सीमा र्‍हाईनच्या डाव्या काठापर्यंत भिडली पाहिजे या आपल्या मागणीचाही द गॉलने यावेळी पुनरुच्चार केला.

स्टॅलिनला ब्रिटन-अमेरिकेचा लष्करी आणि आर्थिक ताकद माहित होती. त्याचप्रमाणे केवळ रशिया आणि फ्रान्स यांच्या मैत्रीवर युरोपचे राजकारण आकार घेऊ शकत नाही या वस्तुस्थितीचाही त्यास विसर पडलेला नव्हता. म्हणून तो द गॉलला म्हणाला, "फ्रान्सची सीमा र्‍हाईनपर्यंत नेण्याचा प्रश्न ब्रिटन-अमेरिकेला विश्वासात घेतल्याशिवाय सोडविता येणार नाही."

मर्यादित स्वरूपाचा फ्रान्स-रशिया करार करण्याची स्टॅलिनची तयारी होती; पण त्यासाठीही तो द गॉलकडून किंमत मागत होता. लंडनमधील निर्वासित पोलिश सरकारकडे पोलंडची राज्यसूत्रे न जाता, ती आपल्या वर्चस्वाखाली राहणाऱ्या पोलिश कम्युनिस्टांकडे जावीत म्हणून स्टॅलिनने लब्लिन येथे पोलिश कम्युनिस्टांचे प्रतिसरकार स्थापन केले होते. पोलंडचे प्रातिनिधिक सरकार म्हणून द गॉलने लब्लिन समितीला मान्यता द्यावी अशी स्टॅलिनने भर घातली.

द गॉलच्या दूरदृष्टीला यातील धोका जाणवला. र्‍हाईनपर्यंत फ्रान्सची सीमा नेण्याबाबत खळखळ करणारा स्टॅलिन पोलंडमध्ये आपले हस्तक सरकार स्थापन करून रशिया आणि जर्मनी यांच्या दरम्यान सुरक्षित अडसर निर्माण करण्याचा खटाटोप करीत आहे हे पाहून लब्लिन समितीला मान्यता देण्याबाबत मुग्धता स्वीकारली.

द गॉलची राजवट पॅरिसमध्ये स्थिरपद होत आहे असे दिसताच मार्शल पेताँ जर्मनीमध्ये पळून गेला. जर्मनी लष्करच शरणागती स्वीकारणार आहे असे दिसून येताच तो स्वित्झर्लंडच्या आश्रयाला आला. पुढे तो आणि त्याचा प्रधानमंत्री लाव्हल

हे दोघेही द गॉलच्या हाती सापडले आणि त्यांना फाशीच्या शिक्षा सुनावण्यात आल्या. पेतांचे वय लक्षात घेऊन त्याला फाशीऐवजी जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. लाव्हलला मात्र फाशी देण्यात आले.

जर्मनीचा पराभव दृष्टिपथात आल्यानंतर, युद्धोत्तर युरोपच्या पुनर्रचनेचा विचार करण्यासाठी रुझवेल्ट, स्टॅलिन आणि चर्चिल यांची याल्टा येथे बैठक भरली. या बैठकीला आपल्याला बोलविण्यात येईल अशी द गॉलची अपेक्षा होती. परन्तु विजेत्या राष्ट्रांच्या नेत्यांनी त्याची जाणूनबुजून उपेक्षा केली. याल्टा बैठक आटापून मायदेशी परतण्यापूर्वी रुझवेल्ट अल्जियर्स येथे थांबला होता. तेथे येण्या-संबंधी त्याने द गॉलला निरोप धाडला. परंतु द गॉलने अल्जियर्सला जायचे नाकारले. जर्मनीने शरणागती स्वीकारल्यानंतर जर्मनीचे विभाजन करण्यासाठी पॉट्सडॅम येथे ट्रुमन स्टॅलिन आणि चर्चिल यांची बैठक भरली. या बैठकीमध्ये जर्मनीचे चार विभाग करण्यात येऊन ते चार विभाग ब्रिटन, अमेरिका, रशिया, फ्रान्स यांच्या नियंत्रणाखाली रहावेत अशी योजना पक्की करण्यात आली या-वेळेलाही द गॉलला बोलाविण्यात आले नाही.

१९४५ च्या ऑगस्टमध्ये द गॉल अमेरिकेला असताना ट्रुमन त्याला म्हणाला, तुम्ही तुमच्या मंत्रिमंडळातले कम्युनिस्ट सदस्य काढून टाकले पाहिजेत."

अमेरिकन राष्ट्राध्यक्षाला खडसाविण्याची संधी द गॉल थोडीच सोडणार होता. तो म्हणाला. "तो आमचा अंतर्गत प्रश्न आहे"

ट्रुमन उत्तरला, "ठीक आहे; मग तुम्ही अमेरिकेच्या मदतीची अपेक्षा बाळगू नका."

अशा तऱ्हेच्या प्रश्नोत्तरांच्या फैरी झडल्यानंतर या बैठकीतून काही निष्पन्न होणे शक्यच नव्हते. द गॉल पॅरिसला परतला तेव्हा त्याच्यापुढे फ्रान्सच्या राज्य-घटनेचा प्रश्न उभा होता. म्हणून प्रथम त्याने, 'तिसऱ्या प्रजासत्ताकाची म्हणजे १८७५ मधील घटना देशाला मंजूर आहे की नाही यासंबंधी सार्वमत घेतले. सत्तर वर्षांपूर्वीची जुनी घटना फ्रेंच मतदारांनी नामंजूर ठरविल्यानंतर नव्या घटना समितीची निवड करणे अपरिहार्य ठरले.

या नव्या घटनासमितीच्या स्वरूपाबाबत द गॉल आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्यात मतभेद होते. घटना समिती जी राज्यघटना तयार करील तीच मान्य करावी आणि ते कार्य पार पाडण्यासाठी घटना समितीवर ठराविक मुदतीचे बंधन असू नये असे कम्युनिस्टांचे मत होते तर नव्याने निवडून येणाऱ्या घटना समितीने सात महिन्यांमध्ये घटनेचा मसुदा तयार करावा आणि त्यावर सार्वमताच्या द्वारे लोकांचा कौल मागावा असा द गॉलचा आग्रह होता.

नोव्हेंबरच्या प्रारंभी घटना समितीची निवडणूक होऊन तीत सर्वात जास्त म्हणजे एकशेअठ्ठावन्न जागा कम्युनिस्टांना मिळाल्या. त्याच्या खालोखाल म्हणजे एकशेबावन्न जागा परंपरावादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एम. आर. पी. या

पक्षाने मिळविल्या. एकशेबेचाळीस जागा मिळवून समाजवादी पक्षाने तिसरा क्रमांक मिळविला. उर्वरित पंचवीस टक्के जागा जहाल आणि उजव्या पक्षांना मिळाल्या. घटना तयार होईपर्यंत संसद म्हणूनही घटना समितीला काम करावयाचे होते. त्याप्रमाणे तेरा नोव्हेंबरला घटनासमितीची पहिली बैठक भरून तीत सरकार-प्रमुख म्हणून द गॉलची एकमताने निवड करण्यात आली.

मंत्रिमंडळ बनविताना मात्र हें एकमत टिकले नाही. आपल्या पक्षाला सर्वात जास्त जागा मिळालेल्या असल्यामुळे संरक्षण, परराष्ट्र आणि गृह ही महत्वाची खाती आपल्या पक्षाला मिळाली पाहिजेत असा कम्युनिस्टांनी दावा केला, तर ही महत्त्वाची खाती रशियाच्या तंत्राने वागणाऱ्या कम्युनिस्टांकडे द्यायला द गॉलचा विरोध होता. आठ दिवस खातेवाटपासंबंधी घोळ सुरू होता. शेवटी एकवीस नोव्हेंबरला द गॉलने आपले बावीस सदस्यांचे मंत्रिमंडळ जाहीर केले. त्यातील पाचजण कम्युनिस्ट होते; परतु महत्त्वाचे एकही खाते त्यांना देण्यात आले नव्हते.

संयुक्त मंत्रिमंडळाच्या या प्रयोगाला द गॉल दोन महिन्यातच कंटाळला. युद्धोत्तर फ्रान्सपुढे अनेक आर्थिक समस्या उभ्या होत्या आणि त्या कशा दूर करायच्या यासंबंधी त्याचे आणि कम्युनिस्टांचे जमण्यासारखे नव्हते. परदेशी मदत घेतल्याशिवाय फ्रान्सची आर्थिक अडचणीतून सुटका होणार नाही हे द गॉलला कळून चुकले. त्याबरोबरच त्याला हेही आढळून आले की जोपर्यंत आपल्या मंत्रिमंडळामध्ये कम्युनिस्ट सदस्य आहेत तोपर्यंत अमेरिकेकडून आपल्याला मदत मिळणे शक्य नाही. त्याचप्रमाणे महायुद्धानंतर अमेरिका आणि रशिया यांच्या दरम्यान जे शीतयुद्ध भडकले आहे त्यात मध्यस्थाची भूमिका बठविण्याइतका फ्रान्स समर्थ झालेला नाही ही जाणीवही त्याच्या मनाला पोखरीत होती.

पक्षोपपक्षांच्या दबावाच्या राजकारणामुळे फ्रान्सला आपल्या मनाप्रमाणे आकार देणे आपल्याला जमणार नाही याचा या मनस्वी वृत्तीच्या नेत्याला अंदाज येताच, नामधारी राष्ट्रप्रमुख म्हणून आपण ओळखले जाता कामा नये असे त्याने ठरविले.

वीस जानेवारी एकोणीसशे शेहेचाळीस रोजी त्याने जाहीर केले– ' मी निवृत्त होत आहे. '

द गॉलच्या या अनपेक्षित निर्णयामुळे फ्रान्सला आश्चर्याचा धक्का बसला, पण फ्रान्स हादरला नाही. एका माणसाची एवढी पर्वा करण्याचे कारण नाही असे फ्रान्सने आपल्या मनाला बजावले.

द गॉलला मात्र माहित होतें की एक दिवस असा उजाडेल की त्यावेळी फ्रान्सला आपली तीव्रतेने आठवण होईल. आपण पुन्हा सत्तासूत्रे स्वीकारली पाहिजेत अशी एकमुखी मागणी करीत लोक कोलोम्बी-ले-दे-एग्लिसे या आपल्या खेड्यात येतील आणि आपल्याला पॅरिसला चलण्याची विनंती करतील.

तोपर्यंत वाट पहायला द गॉलची तयारी होती. (क्रमशः)

पुस्तके

श्री. म. भावे

# भारतीय समाजवादाची वाटचाल

भारतीय समाजवादाचा विचार करताना काही प्रश्न सुरुवातीसच उपस्थित होतात. पहिलाच प्रश्न हा की समाजवादी विचार या भूमीत उद्भवलेच कसे ? येथील समाजव्यवस्थेतील विषमता केवळ आर्थिक नव्हती. समाज-जीवनाच्या प्रत्येक अंगोपांगातून तिचे प्रत्यंतर येत होते. त्यातून या समाजव्यवस्थेत असा काही समतोल साधला गेला होता की या समाजव्यवस्थेहून निराळी व चांगली समाजव्यवस्था येथे अस्तित्वात येऊ शकते अगर यावी असे प्रतिभावंत समाजधुरिणांनादेखील वाटत नव्हते. त्यामुळे ज्यांना समाजवादी विचार असे आपण जरा मैल अर्थाने म्हणू शकू असे विचार केवळ भूतदयेतूनच निर्माण होत होते. अशा स्थितीत परदेशी समाजवादी विचार येथील काही पुढाऱ्यांनी कसे आत्मसात केले ?

या पुढचा प्रश्न असा की, हे विचार कशाच्या आधारावर वाढले ? सामाजिक परिवर्तनाची गरज उत्पादनव्यवस्थेत क्रांतिकारी बदल घडून आल्याखेरीज भासत नाही. येथील प्रमुख व्यवसाय शेती. या व्यवसायातील उत्पादन पद्धतीत गेल्या हजार वर्षांत तरी क्रांतिकारी बदल झाला नाही. अशा स्थितीत सामाजिक परिवर्तनास अनुकूल अशी परिस्थिती येथे नव्हती असे म्हणावयास हरकत नाही. तेव्हा साहजिकच असा प्रश्न उद्भवतो की समाजवादी विचारांची व समाजवादी चळवळीची येथील प्रगती कोणत्या कारणांनी झाली !

आज समाजवादी विचारांचा जोर आपल्याकडे फार वाढलेला दिसतो. राजकीय संधिसाधूपणाचा यात काही भाग असेलही, परंतु हे मान्य करावेच लागले की सामान्य माणसापर्यंत आज हे विचार पोहचले आहेत आणि समाजातील बराच मोठा गट या विचारांना अनुकूल झाला आहे. हे सर्व जरी खरे असले, तरी या विचारात दोन मोठे दोष राहिले आहेत. पहिला दोष असा की ज्या सामान्य माणसाची अनुकूलता या विचारांना आहे, त्यांनी या विचारांचा स्वीकार बऱ्याचश

प्रमाणात एक वैचारिक चूष म्हणून केला आहे, आणि या विचारांची अंमल बजावणीही एक प्रयोग म्हणून होणार आहे. याचाच अर्थ असा की समाजवादी विचार हे जीवनव्यवहाराचा एक अपरिहार्य भाग आहे, समाजवाद हा जीवनाचा एक मार्ग आहे ही जाणीव सामान्यात निर्माण करण्यास समाजवादी नेते असमर्थ ठरले आहेत, दुसरा दोष हा की येथे अस्तित्वात असलेल्या समाजरचनेचे सहानुभूतीपूर्वक परीक्षण करून तिची शक्तिस्थाने व मर्मस्थाने समजावून घेण्याचा प्रयत्न या विचारांनी कधी केला नाही. हे दोष या विचारात निर्माण होण्याची काही कारणे आहेत का, हा तिसरा प्रश्न होय.

'भारतीय समाजवादाची वाटचाल' हे पुस्तक वाचण्यास घेताना या व अशा इतर प्रश्नांची चर्चा वाचावयास मिळेल अशी अपेक्षा होती. त्यातून हे पुस्तक श्री. मधु दंडवते यांच्यासारख्या समाजवादी चळवळीत अनेक वर्षे काढलेल्या विचारवंताने लिहिले असल्याने त्या अपेक्षा पूर्ण होतील अशी आशाही वाटत होती. परंतु खेदाची गोष्ट अशी की पुस्तक वाचून संपूर्ण निराशा पदरी पडली.

'भारतीय समाजवादाची वाटचाल' हे या पुस्तकाला दिलेले नाव दिशाभूल करणारे आहे. 'जनवाणी' या साप्ताहिकात प्रजासमाजवादी पक्षाचा इतिहास व त्या पक्षाची धोरणे याविषयी लिहिलेल्या लेखांचे हे एक संकलन आहे. १९३४ साली काँग्रेस-समाजवादी पक्षाची स्थापना झाली. त्यानंतर १९४८ साली हा पक्ष काँग्रेसमधून फुटला आणि समाजवादी पक्षाची स्थापना झाली. १९५२ सालच्या निवडणुकीत पक्षाचा पराभव झाल्याने त्याने प्रजापक्षाशी एकी केली व त्यातून प्रजासमाजवादी पक्ष निर्माण झाला. १९५४ साली या पक्षातून डॉ. लोहिया, श्री. मधु लिमये बाहेर पडले व त्यांनी पुन: समाजवादी पक्ष या नावाचा पक्ष स्थापन केला. १९६३–६४ साली प्र. स. पक्षातून श्री. अशोक मेहता व इतर कार्यकर्ते काँग्रेसमध्ये गेले. १९६५ साली समाजवादी व प्र. स. पक्षाची एकी व फाटाफूट झाली आणि १९६५ पासून पुनर्संघटित प्र. स. पक्ष कार्य करीत आहे. हा सर्व इतिहास या उण्या-पुऱ्या सव्वाशे पानांच्या पुस्तकात अत्यंत रटाळ भाषेत आणि कंटाळवाण्या पद्धतीने सांगितला आहे.

स्वत:च्या पक्षाविषयी लेखकाला वाटणारा जिव्हाळा समजू शकतो. परंतु आपल्या पक्षाच्या त्रोटक इतिहासातून भारतीय समाजवादाच्या वाटचालीची माहिती आपण देत आहोत ही लेखकाची प्रौढी हास्यास्पद आहे. पक्षाच्या निरनिराळ्या अधिवेशनातून झालेल्या ठरावांची जवळ जवळ जंत्रीच या पुस्तकात दिली आहे. त्यातून भारतातील समाजवादी विचारांच्या प्रगतीचा आलेख मिळतो असे तर लेखकाला सुचवावयाचे नाही? असा संशय घेण्यास जागा आहे. कारण सध्याचा प्र. स. पक्ष हे समाजवादी चळवळीचे सर्वात उत्क्रांत स्वरूप आहे अशी 'कौतुकास्पद' बढाई पहिल्याच पानावर मारलेली आढळते. पक्षाच्या प्रत्येक

अधिवेशनात 'सुस्पष्ट मार्गदर्शन' करण्यात आले, वादग्रस्त प्रश्नांना 'समाधानकारक' उत्तरे मिळाली, 'संदिग्धता' दूर झाली. जणू काही युक्लिड जिवंत असता तर प्र. स. पक्षाच्या ठरावांचा अभ्यास करूनच त्याने 'भूमिती' लिहिली असती.

प्र. स. पक्षाच्या राजकीय भूमिकेचा सखोल अभ्यास तरी या पुस्तकात करायला हवा होता. १०·४१ टक्के मते १९५२ साली या पक्षाला मिळाली होती. १९६७ साली केवळ ३·१ टक्के मते मिळून त्याचे 'अखिल भारतीयत्व' जेमतेम टिकले. १९५७ साली या पक्षाचे १९५ आमदार होते, १९६७ साली त्यांची संख्या फक्त १०४ होती. पक्षाच्या या परागतीचा अभ्यास नव्या निवडणुकांसाठी तरी उपयोगी पडला असता. पण आपल्या पक्षाची ही अधोगती प्रांजळपणे उघड केली असती तर समाजवादी चळवळीचा आपला पक्ष हा एकमेव पाईक ही आत्मप्रौढी पोकळ ठरली असती. म्हणून आत्मपरीक्षणाचा अवघड मार्ग सोडून ठरावांची कात्रणे एकत्र जोडण्याची सोपी वाट धरावी लागली.

भारतीय राजकारणात डाव्या अंगाचा प्रतिसहकार पक्ष म्हणून प्र. स. पक्षाने नावाजण्याजोगी कामगिरी केली आहे. या प्रतिसहकारातच पक्षाचे बळ आणि कमकुवतपणा सामावलेला आहे. प्रतिसहकाराच्या भूमिकेमुळे सामान्य जनतेत या पक्षाविषयी आकर्षण नाही. त्यामुळे दुसऱ्या पक्षांच्या मदतीखेरीज हा पक्ष निवडणुकीत तगू शकत नाही. त्याचबरोबर प्रतिसहकाराच्या भूमिकेमुळेच इतर पक्षांनाही या पक्षाशी सहकार्य करण्याची उत्सुकता वाटते.

प्र. स. पक्षाची दुसरी कामगिरी म्हणजे त्याने विचारवंतांना नेहमीच राजकीय आसरा पुरविला आहे. अर्थात अनेक विचारवंतांनी काँग्रेस-प्रवेशापूर्वीचे पथिक-गृह म्हणून या पक्षाचा उपयोग केला ही गोष्ट खरी पण तो दोष पक्षाचा नव्हे. या विचारवंतांमुळे पक्षाला प्रतिष्ठा मिळाली पण त्याचबरोबर सामान्य कार्यकर्त्याला पुढे येण्यास वाव उरला नाही.

प्र. स. पक्षाचे नेतृत्व नेहमीच उच्चवर्णीय राहिले आहे. त्यामुळे कोणत्याच प्रश्नाविषयी टोकाची भूमिका हा पक्ष घेऊ शकत नाही. त्यामुळे सामान्यांच्या प्रश्नाची आच या पक्षाला नाही अशी समजूत पसरते. उदाहरणार्थ सं. स. पक्षाचे नेते नेहमीच एतद्देशीय भाषांत बोलतात व पक्षाच्या कामकाजातून त्यांनी इंग्रजीचे उच्चाटण केले आहे. प्र. स. पक्षाने याविषयी कोणतीही उत्सुकता दाखविलेली नाही.

या व अशा इतर दृष्टिकोणातून प्र. स. पक्षाचे परीक्षण लेखकाने केले असते तर पुस्तक सार्थकी लागले असते.

भारतीय समाजवादाची वाटचाल : मधु दंडवते

साधना प्रकाशन : पृष्ठे ११२ : किंमत २·५०.

## हे फार अपुरे आहे

# दिल्लीच्या अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा

कबड्डीचा खेळ हाच खरा राष्ट्रीय खेळ असा एक गोड (गैर) समज सध्या आढळून येतो. अखिल भारतीय कबड्डी स्पर्धात निदान पुरुष विभागात तरी साऱ्या राज्यांचे संघ भाग घेतात असा दावा या समजाच्या पुष्टीसाठी जोडला जातो. (खोखोमध्ये भारतातल्या निम्म्या राज्यांचे संघ येताना मारामार हेही सांगण्यात येतेच) थाटामाटानी भरविलेल्या सामन्याची वर्णने पंतप्रधान अथवा राष्ट्रपतींनी झाडलेली पायधूळ वगैरेची वर्णने मग आलीच.

फाजील आत्मगौरवाची भावना विकासाला नेहमीच मारक ठरते. सत्य कटू असते म्हणून सोइस्करपणे त्याला बगल देण्यात येऊ नये. महाराष्ट्राच्या बाहेरच्या राज्यात कबड्डीची अवस्था दयनीय आहे किंवा कोणती अवस्थाच अस्तित्वात नाही. महाराष्ट्राला लागून असलेले गुजरात, मध्य प्रदेश आणि कर्नाटक राज्ये काही प्रमाणात अपवाद म्हणून सोडता येतील. बाकीच्या कोणत्याही राज्यात राष्ट्रीय सामन्यात प्रांताचा संघ पाठविणे यापलिकडे कोणत्याच प्रकारे कबड्डीच्या वाढीचे सोयरसुतक जोडलेले नसते. दिल्ली, हरियाना, पंजाब आणि उत्तर प्रदेशातील सर्वच राज्यात कबड्डीच्या नावाखाली खेळला जाणारा खेळ हा रूढ महाराष्ट्रीयन कबड्डीपेक्षा सर्वस्वी वेगळा असतो. त्यामध्ये एकच गडी एका गड्याला धरतो. क्रीडांगणाची लांबी दीडशे फूट असते.

सुसंघटितपणे, कार्यक्रम ठरवून कबड्डीच्या विकासासाठी काही किमान गोष्टी दरवर्षी केल्या जाव्यात आणि हळूहळू पण निश्चितपणे कबड्डी रुजत आहे आणि वाढत आहे याचा दिलासा देशातील हजारो-लाखो क्रीडाशौकीनांना मिळावा अशी कोणतीही भरीव कामगिरी अखिल भारतीय कबड्डी असोसिएशनने गेल्या आठ-दहा वर्षात केली नाही. गेल्या आठ वर्षांत अलाहाबाद, बडोदे, हैद्राबाद, कोल्हापूर आणि मुंबई या पाच राष्ट्रीय सामन्यात स्वत: खेळाडू म्हणून भाग घेतलेल्या मला वाटणारी ही

खंत दिल्लीच्या यावर्षी झालेल्या अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेनंतरही कायम आहे. आणि कबड्डी संघटनेच्या अंतर्गत लाथाळीमुळे त्यामध्ये सध्यातरी फरक पडण्याचे भाग्य दिसत नाही.

तेव्हा खऱ्याखुऱ्या अशा या एकमेव अखिल भारतीय सामन्याचे वर्णन हे फक्त सामन्यांचेच ठरते. ज्या व्यापक पार्श्वभूमीवर याचा विचार करावा ती पार्श्वभूमी चितारावयाचा कॅनव्हास अजून बहुतेक ठिकाणी कोराच आहे.

जागेचा आणि वेळचा मुहूर्त यंदा लवकर सापडला नाही. गेले सहा वर्षे मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात यामध्येच घुटमळणारे हे सामने (त्यापैकी महाराष्ट्रात तीन वेळा) कोण्या दूरच्या प्रांतात जावेत असा प्रयत्न. प्रथम मद्रास मग जयपूर आणि मग दिल्ली अशा जागा बदलत गेल्या. या साऱ्या गोंधळात डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात होणारे हे सामने फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत लांबले.

महाराष्ट्र राज्याच्या पुरुष संघावर यंदा विशेष जबाबदारी होती. गेल्या अठरा वर्षात हॅटट्रीक मिळवण्याची संधी फक्त यंदाच त्यांना उपलब्ध झाली होती. तर महिला संघाला नेहमीप्रमाणेच पंधरा वर्षाच्या अखंड विजयाची परंपरा सांभाळायाची होती. अलिबागचे चार दिवसाचे सराव शिबिर आणि मुंबईचा शानदार निरोप समारंभ घेऊन हा संघ दिल्लीला पोचला. (विदर्भ आणि कोल्हापूर कबड्डी असोसिएशन या दोन प्रादेशिक संघटनांचे संघही महाराष्ट्रातून आले होते.)

महाराष्ट्राच्या विभागात होते हरियाना, हैद्राबाद, ओरिसा आणि तामीळनाडू हे संघ. अनपेक्षितपणे महाराष्ट्राला आपल्या विभागातूनच वर येण्यासाठी निकराची झुंज द्यावी लागली. रेल्वे आणि महाराष्ट्र हे हमखासपणे अंतिम फेरीत भेटणारे दोन बलाढ्य संघ. मागच्या वर्षी विभागीय सामन्यात राजस्थानने आणि पोस्ट व तार खात्याने रेल्वेला अक्षरश: नाकात दम आणला तर यंदा हरियाना आणि हैद्राबादने महाराष्ट्राचे हाल केले. हैद्राबादच्या वासुदेवने घेतलेल्या बेदरकार पकडीने महाराष्ट्र संघाच्या तोंडचे पाणी पळाले होते. शेवटी बाळ कोंडाळकर पावला आणि सामना समान गुणावर ६–६ ठेवण्यात महाराष्ट्राला यश मिळाले. हरियानाच्या हरबनसिंगने तर एकट्याच्याच चतुरस्र खेळाने सामना फिरवण्यात जवळ जवळ यश मिळवले होते. धुसमुसळी चढाई करून कसेही धरले तरी पार्टी घर देण्याची त्याची धमक रंग भरणारी ठरली. अवघ्या दोन गुणांनी महाराष्ट्राने हा सामना जिंकला.

विदर्भ, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश आणि दिल्ली हा दुसरा गट. महाराष्ट्राच्या मातीच्या कबड्डीचा कस हा सकसच असतो हे या गटात विजयी ठरून विदर्भाने सिद्ध केले. त्यांना थोडी झुंज द्यावी लागली ती मध्य प्रदेशाबरोबरच. पहिला गुण हातातून निसटला होता पण मध्य प्रदेश संघाचा कणा सदा केकरेला राउतने पकड घेतली आणि सामना हातात घेतला. पण फक्त पाच गुणांनीच

विजयी होण्यावर त्यांना समाधान मानावे लागले.

कोल्हापूर अथवा केरळसारख्या संघाचा पराभव करून विभागीय विजेतेपद मिळवताना रेल्वेच्या बलाढ्य संघाला फारसा त्रास झाला नाही.

पोस्ट आणि तार खाते, बंगाल, म्हैसूर, पंजाब हा विभाग तसा तुल्यबळ संघाचा मागील वर्षीचा उपविजेता म्हैसुर संघ मात्र यंदा विभागीय अजिंक्यपदही मिळवू शकला नाही. बंगालने आपले निर्विवाद वर्चस्व या विभागावर प्रस्थापित केले.

बाद पद्धतीच्या उपांत्य सामन्यात विदर्भ, महाराष्ट्र, बंगाल आणि रेल्वे यांची गाठ पडली. मागील वर्षी महाराष्ट्राला उपांत्य फेरीत याच संघाशी खेळावे लागले होते आणि बाळ कोंडाळकरच्या आणि वसंत सूदच्या प्रभावी चढायांनी विदर्भ हतप्रभ झाला होता. यंदा मात्र सामना कमालीचा थंड झाला. मध्यंतरापर्यंत सामना शून्य गुणांवर. मग बाळासाहेबांना उतरविले. पण मागच्या वर्षीची चूक सुधारून जनार्दन देशमुखने कोंडाळकरला अचूक पकडले. प्रत्येक सामन्यात महाराष्ट्राचा आधार ठरलेल्या शेखर शेट्टीने याही वेळेस सफाईने एक गडी टिपला. पण तरीही पहिला गुण मिळवल्याने बोनस गुणाचा फायदा विदर्भाकडे होता. रीठे या हुशार आणि चपळ खेळाडूची त्यापेक्षाही अधिक चपळतेने पाठीवरून फिरून शिवाजी जगतापने पकड घेतली आणि महाराष्ट्राने अटीतटीच्या उपांत्य फेरीतून रेल्वेबरो-बरच्या सामन्यासाठी अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत रेल्वेने मात्र बंगालला एकतर्फी हरविले.

---


# शिलंगणाचं सोनं

आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन


---

रेल्वे आणि महाराष्ट्र या संघाच्या अंतिम सामन्याचा एक गमतीदार इतिहास आहे. पहिला गुण रेल्वेच्या संघाने मिळविला तर रेल्वेचा संघ एकतर्फी सामना जिंकतो (अलाहाबाद, बडोदा, हैद्राबाद) पण पहिला गुण महाराष्ट्राला मिळाला तर मात्र सामना चांगलाच रंगतो (कोल्हापूर, इंदूर आणि आता दिल्ली) यावेळी पहिला गुण शेखर शेट्टीने नोंदवला. खरे खेळत असताना उंचीचा फायदा घेऊन वेगवान लाथेने गडीबाद करण्याचे या खेळाडूचे कौशल्य अप्रतिम आहे. अशा सामन्यत पहिला गुण मिळवणे म्हणजे निम्म्याहून अधिक विजय खिशात घालण्यासारखे. पण रेल्वेच्या भोला गुरगने महाराष्ट्राला हे समाधान लाभू दिले नाही. उत्तापुऱ्या आणि आंतरराष्ट्रीय वजन उचलण्याच्या स्पर्धेत भाग घेणाऱ्या या खेळाडूला पुढे डाईव्ह मारण्याची घाई शिवाजी जगतापसारख्या अनुभवी कोपऱ्याने केली आणि तीन खेळाडू एकाच चढाईत लोळवून भोलाने त्याचा अचूक फायदा उठविला. व (इंदूरला पहिला गुण वसंत सूदन मिळवला होता आणि मदन पुजारीने तीघांना एकदम बाद केले होते—खेळाडू वेगळे पण इतिहास अगदी तसाच) पुरे लोण लावून रेल्वेने आपले वर्चस्व (१८–९) सामन्यावर प्रस्थापित केले. पुन्हा एकदा बाळ कोंडाळकरने खळबळ माजवली. त्याने सामना संपण्याला थोडाच अवधि असताना तीन गडी बाद केले. भोलाने त्याला धरण्याची केलेल्या घाईचा त्याने फायदा उठविला. शेवटच्या चार मिनिटात सामन्याचा ताण गोंधळ आणि अनिश्चितता कमालीची वाढली होती पण या साऱ्यातून यंदाच संघनायक झालेल्या सदानंद शेटेने शांतपणे मार्ग काढला आणि एक गुणाने का होईना पण संघाचा विजय नोंदविला. महाराष्ट्राच्या संघात वसंत सूद आणि मधु पाटील या दोन्ही खेळाडूंची अनुपस्थिती जाणवली. वसंत सूद जायबंदी झाल्यामुळे खेळू शकला नाही. मधुची तर निवडच झाली नव्हती या दोन्ही खेळाडूंनी इतिहास निराळा घडविला असता असे मानण्यास भरपूर जागा आहे.

महिला विभागातील या गटात हैद्राबाद आणि कोल्हापूरला विदर्भाने सहज हरवले. निलीमा चटर्जी, जयश्री खापर्डे, शोभा कळांडे या यंदा महाराष्ट्र राज्य क्रीडामहोत्सव गाजविणाऱ्या महिला येथेही चमकल्या. महाराष्ट्र, हरियाना, राजस्थान या विभागात प्रश्नच नव्हता. मध्यप्रदेश, केरळ, पंजाब या विभागात मध्यप्रदेश अजिंक्य ठरले. ज्योति गाडे चढाई आणि क्षेत्ररक्षण दोन्ही मध्ये चमकली. नेहमी भरभक्कम शरीरयष्टीच्या असणाऱ्या पंजाब हरियानाच्या महिला खेळाडू यंदा दहा-अकरा वर्षाच्या छोटया शाळकरी मुली होत्या. नेहमीच्याप्रमाणे त्या बट घालूनच खेळल्या. दिल्ली, तामीलनाडू आणि उत्तरप्रदेश गटात तामीळनाडू अजिंक्य ठरले. उपांत्य सामना रंगला. मध्यप्रदेश आणि विदर्भाचा. मध्यंतरापर्यंत विदर्भ चांगला बारा गुणांनी आघाडीवर होता. मध्यंतराला त्यांनी सुषमा अवधिनकर या राखीव खेळाडूला संधी देण्यास उतरवले आणि तिच्या चुकीच्या पकडीने

एकाच चढाईत ज्योती गाडे पाच गडी घेऊन गेली. मग विदर्भाच्या हातात फक्त पराभव आणि पश्चातापच राहिला. विभागीय सामने तामीळनाडू आणि मध्यप्रदेश बरोबरचे उपांत्य व अंत्य सामने हे सर्व सामने महाराष्ट्राने एकतर्फी जिंकले. नावर भगिनीं, जया बांदोडकर, निलीमा पुराळकर यांचे विशेष कौतुक करावयास हवे महाराष्ट्रीय महिला संघ सतत सोळा वर्षे राष्ट्रीय अजिंक्यपद मिळवतो याचा आनंद मानायचा की सोळा वर्षात एकाही प्रांताने एकदाही महाराष्ट्रसंघाच्या जवळपास फिरकू नये याची खंत मानायची ?

सामन्याला गर्दी यथातथाच होती. (तिकीट लावले असते तर कोणीच फिरकले नसते हे कार्यकर्त्यांचे मत) जेवणाची व्यवस्था चांगली पण अंघोळीसाठी सर्व पुरुष संघाला एक आणि महिला संघाला एक नळ. दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीत साहजिकच बहुतेकांनी आंघोळीची गोळी घेतली. राष्ट्रपती भवनात पंधरा मिनटे चहापान झाले पण महानगरपालिकेला मात्र विस्मरण व्हावे याचे अनेकांना आश्चर्य वाटले.

भारतीय कबड्डी असोसिएशनच्या नेतृत्वाचा खांदेपालट वगैरे प्रश्न निकालात निघाले. अलाहाबादचे अध्यक्ष त्रिपाठी हे उस्तादोंके उस्ताद या पद्धतीने सध्यातरी वागत आहेत. (अर्थात सर्वच राजकारण अलाहाबादचीही परंपराच आहे)

चार चांगले, चार फालतू सामने, बरी गर्दी थोडी करमणूक हेच या सामन्यांचे फलित काय ? भारतभर जिल्हावार संघटना तरी प्रत्यक्ष राज्यात अस्तित्वात याव्यात, अविकसित भागात दौरे आखावेत. कबड्डीचे स्वरूप आकर्षक करण्यासाठी त्यात बदल घडवावेत हे आणि असे अनेक उपक्रम आहेत. वर्षातून केवळ एकदाच ज्या ठिकाणी सर्व राज्याचे प्रतिनिधी भेटतात त्या ठिकाणी या बाबतीत सामसूम दिसावी आणि सामने यशस्वी झाल्याचा डांगोरा पिटण्यात यावा यात काय अर्थ ?

डॉक्टर्स आहेत. एकेकाला आम्ही ठार करणार ! त्याशिवाय इलाज नाही " तो सांगत होता.

" पण मग त्या जाधवपूर युनिव्हर्सिटीचे उपकुलगुरू डॉ. सेनना का मारलं ?" मी अगदी वकीली प्रश्न टाकला " शिक्षकांनी तुमच्या समाज व्यवस्थेत काय वाईट केलंय ?",

" Oh, I am sorry about it. मी त्याच विद्यापीठातून इंजिनिअर झालो ! फार देव माणूस होता तो ! मला माहित आहेत ते ! कुणी तरी गुंडांचे हे अधम काम आहे " तो कमालीचा अस्वस्थ होत म्हणाला,

" म्हणून, म्हणूनच मी या हिंसाचाराच्या विरुद्ध आहे " आम्हांनी आता तोंड उघडलं !

' No, No. that is not possible we cannot give up our way ! क्रांतिच्या या यज्ञात काही निरपराध माणसांचे बळी जातीलही. म्हणून काही क्रांतिचा मार्ग आम्हाला रोखता येणार नाही " तो पुनः एकदा निश्चयी स्वरात म्हणाला.

अरेच्चा, म्हणजे माझा वकिली प्रश्न अगदीच वाया गेला ! त्याची क्रांतिच्या अपरिहार्यतेबद्दल पक्की खात्रीच झाली होती !

खरं सांगायच तर माझी सुद्धा आता खात्री व्हायला लागली होती !

" अजूनही ही धोरण बदलली नाहीत तर बंगालचं काय होईल मला सांगता येत नाही ! पूर्व बंगालमध्ये शेख मुजिबुर प्रचंड मतांनी निवडून आला आहे. बंगालची जर तुम्ही हेटाळणी केलीत, तर पश्चिम बंगाल भारतापासून फुटून निघेल आणि दोन बंगाल एक नव राष्ट्र स्थापन करतील. " तो अत्यंत शांतपणे सांगत होता.

हा मात्र कळस झाला ! माझी वादविवाद करायची खुमखुमी पुरती जिरली होती.

" तुम्ही इथे मुंबईला काय करता ?" चर्चेची राष्ट्रीय पातळी मी आदी व्यक्तिगत पातळीवर आणली.

" I am a consulting engineer to Kirloskar at Poona. " स्वत: विषयी तो आताच बोलत होता, " मागच्याच वर्षी मी मुंबईत आलो, माझं सारं शिक्षण कलकत्यालाच झालं !"

" मग तुम्हाला आमच्या या मुंबई-पुण्याच्या औद्योगिक प्रगती विषयी काय वाटतं ?" ' आमच्या महाराष्ट्राविषयी चार शब्द बरे ऐकायला मिळावेत म्हणून

घी विचारले.

" It is excellent ! खरोखरच छान औद्योगिक प्रगती होत आहे मुंबई पुण्याकडे. But it is at the cost of Bengal " वंगभूमीविषयी त्याला वाटणारा जिव्हाळा पुन: एकदा व्यक्त झाला.

" बंगालमध्ये आज औद्योगिकरण पार थंडावलय, त्यामुळं नवे कारखाने या पश्चिम भारतात वाढत आहेत. This industrialisation is at cost of Bengal ! But I am happy मला आनंदच वाटतो. काही का होईना भारताची भरभराट होते आहे ना चांगलं आहे ! इंग्लंड अमेरिकेपेक्षा महाराष्ट्र गुजराथमधून नवा औद्योगिक माल भारतात मिळू लागला याचा मला अभिमानच वाटतो. पण हे दैवाचं चक्र आहे ! आज आम्ही खालच्या टोकाला आहोत तुम्ही वर आहात, हे दैवी चक्र फिरत राहणार आहे ! उद्या आमच्या भाग्याचा दिवस येईल. " तो बोलत होता !

" एकूण या सरकारी धोरणाच्या बाबतीत गुजराथ महाराष्ट्राची सरकारे भाग्यवान म्हणायची, आमच्याकडे निदान हा अराजकाचा प्रॉब्लेम तरी नाही." मी जरा हुरुपानं बोललो.

" Yes, You are lucky about these policies " तो निश्चयानं म्हणाला, " but only lucky not wise ! "

का ! का ! मी पुन: एकदा सपशेल डाऊन झालो होतो. ' कारण, इथं देखील तितकच क्रूर Exploitation चाललंय. काही एक कमी नाही. तुम्ही मुंबईकर Sky skrappers विषयी मोठ्या आढ्यतेनं सांगता, पण मुंबईच्या झोपडपट्टीचा कधी विचार करता का ? जसजशा या इमारती उंच उंच वाढत जातील तसतसा या झोपडपट्ट्यांचा प्रश्न उग्र होणार आहे ! पण तुम्ही विचार कुठ करता आहात ? तुम्ही पण विचार करीत नाही आणि ते झोपडपट्टीतील लोकही करीत नाहीत. जोपर्यंत हे झोपडीतील गरीब विचार करीत नाहीत तोपर्यंत तुम्ही भाग्यवान् ! एकदा का त्यांना त्यांच्या पिळवणुकीची जाणीव झाली की मग बंगालच्याच मार्गानं तुम्ही जाणार आहात तुम्हाला दुसरा मार्ग नाही ! " तो शांतपणे सिगारेट शिलगावीत बेफिकीरपणे म्हणाला.

माझी सारी ' अर्ग्युमेंटस ' संपली होती. तेवढ्यात दादर स्टेशन येते. मी लगबगीनं खाली उतरतो. आणखी काही जळजळीत ऐकण्याची माझी खरोखरच तयारी नसते.

" What Bengal thinks today India will think tomorrow. " त्या तरुण बंगाली इंजिनिअरचे शब्द माझ्या मनाला बेचैन करीत असतात !

□ □ □

# धुम्मस धुम्मस धुम्मस धुम्मस....

गुजराथी रंगभूमीवर गाजत असलेले हे नाटक मुंबईच्या इंडियन नॅशनल थिएटर या संस्थेने मोठ्या थाटामाटत मराठी रंगभुमीवर आणल आहे. नाटकाच नाव तेच कायम ठेवलं असून दिग्दर्शन श्री. प्रविण जोशी यांचेच आहे. गुजराथी रंगभूमीवर काम करणारी सरिता मराठी धुम्मस मध्येही त्याच भुमिकेमध्ये वावरत आहे.

स्वतःच्या पत्नीचा खून केल्याचा एका नामवंत कलाकारावर आरोप येतो. पुरावा इतका बिनतोड जमा होतो, की सुटण्यास जराही वाव नसतो. यातून सुटण्याचा एक मार्ग म्हणून हा कलाकार आपण वेडे असल्याचे नाटक करतो आणि नाटक वठविण्यात यशस्वी ठरतो. कोर्टामार्फत त्याची रवानगी वेड्याच्या हॉस्पिटल मध्ये होते. तेथील वातावरणाला कंटाळून हा शहाणा वेडा पळून जायचा निर्णय घेतो. त्याप्रमाणे संधी मिळताच प्रमुख डॉक्टर पंडीत आणि त्यांचे सहाय्यक ठाकूर यांना गुंगारा देऊन तो निसटतो. हॉस्पिटलच्या नियमाप्रमाणे पळून गेल्यापासून २८ दिवस फरारी रहाण्यात यशस्वी ठरल्यास त्याच्या केसचा मुळापासून पुर्नविचार होणार असतो. सुटण्याची संधी उपलब्ध होण्याची शक्यता असते.

पळालेला हा वेडा नजीकच्या बंगल्यात आश्रयार्थ जातो. जगमोहन यांच्या बंगल्यामध्ये त्यांची पत्नी राधा अगदी एकटी असते. प्रारंभी भेदरलेली ही राधा वेड्याला चांगलाच 'घोळात' घेते. मध्यरात्री अचानक जाग आल्याने वेडा बाथरूम मध्ये जातो, आणि चक्रावून ओरडत बाहेर येतो. बाथरूममध्ये जगमोहनचे प्रेत त्याला दिसते. आपण पुन्हा एकदा जाळ्यात सापडलो आहोत, अशी त्याची खात्री होते. राधावर पतिच्या खूनाचा आरोप करून तो तिला बाथरूमकडे घेऊन जातो. पण आता बाथरूममध्ये काहीच नसते. गुंतागुंत वाढत जाते. वातावरण तापत जाते. प्रेक्षक अस्वस्थ होतात. जगमोहनचा खरच खून होतो का? झाला असल्यास खूनी कोण? याची आश्चर्यजनक उकल नाटकाच्या अखेरच्या भागात पहावयास मिळते. तो कथाभाग सांगून नाटकाच्या भावी प्रेक्षकांची रसहानी करण्याचे मला प्रयोजन नाही.

तर अस हे गुंतागुंतीच, रहस्यमय कथानक असलेलं नाटक, नाटकाची नस अचूक पकडून आय्. एन्. टीनं रंगभूमीवर आणल आहे. निर्मितीची बाजू उत्कृष्ठ आहे. जगमोहनच्या घराचा सेट झकास लावला आहे. आणि लावलेल्या या सेटचा वापरही मोठ्या कौशल्याने करण्यात आला आहे. प्रथम प्रवेशातील वेड्यांच्या हॉस्पीटल•

मधील डॉक्टर पंडित यांचे ऑफिसही आटोपशीर लावले आहे. प्रकाशयोजनेचा वापर नाटकाची रंगत वाढेल, अशा पद्धतीने केला आहे.

## सतीष दुभाषी वर्चस्व !

वेडया कळावंताची भुमिका सतीष दुभाषी यांनी मन लावून केली आहे, प्रयोगामध्ये त्यांचा वाटा फार मोठा आहे. संवाद बोलण्याची पद्धत, संवाद फेक, आणि टायमिंग या तिन्हीचा मेळ ते मोठ्या कौशल्याने साधतात, त्यात बरोबरचे कलावंत अगदीच यथातथा असल्याने त्यांचे व्यक्तिगत यश हेच प्रयोगाचे मोठे यश ठरते. सरिताची मराठी रंगभुमीवरील ही पहिलीच भूमिका. ती काम मनमोकळेपणे करते, संवाद कमी असलेल्या भागामध्ये तिचा प्रभाव चांगला पडतो, उदाहरण म्हणून पहिल्या व तिसऱ्या अंकाच्या अखेरीचा भाग. परंतु संवाद बोलण्याचे तंत्र तिला अवगत नसल्याच जाणवते. चुकीच्या शब्दांवर भर देणे, संवाद बोलण्याची अकारण घाई करणे, यासारख्या दोषांमुळे अनेकवेळा रसहानी होते.

अन्य कलाकारांना फारसा वाव नाही. आणि जी थोडीफार संधी मिळते. त्याचा एक मोहन कोठीवान (इन्स्पेक्टर) सोडले तर अन्य कलावंत फायदा घेऊ शकत नाहीत. हिन्दूराव पाटील यांच्या डॉक्टर पंडीत तर अतिसामान्य वाटतो. पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रवेशाचे अखेरीस तर ते चक्क विनोदी वाटतात. कलाकारांचा संच म्हणून 'धुम्मस' फारसे यशस्वी ठरत नसले, तरी एक रहस्यमय विषयाची सुरेख मांडणी या नाटकात पहावयास मिळते. दिग्दर्शक प्रवीण जोशी यांनी प्रयोगावर भरपूर मेहनत घेतली आहे पहिल्या अंकातील पहिला प्रवेश संपल्यावर म्हणजेच वेडा पळून गेल्यावर प्रेक्षागृहासह सर्वत्र लाईट फिरवण्याची कल्पना चांगली वाटली त्यामुळे प्रवेशाचा 'इम्पॅक्ट' चांगलाच वाढतो. राधा व वेडा यांच्यामधील अनेक सिन्स त्यांनी चांगले बसवले आहेत. काही चांगली सूचक कंपोझिशन्स ही पहावयास मिळतात. एक अगळा–वेगळा प्रयोग म्हणून धुम्मस लक्षात राहील. या नाटकाचा गुजराथी प्रयोग पाहून बी. आर. चोप्रा यांना चित्रपटाची कल्पना सुचली. आणि त्यांनी 'इत्तेफाक' हा चित्रपट तयार केला. त्या चित्रपटासंबंधी माणूसमध्ये लिहीताना मी श्री. अनंत ओक यांनी दिग्दर्शित केलेल्या 'अठ्ठावीस दिवस' या नाटकाचा उल्लेख केला होता, रंगा संत यांनी लिहिलेले हे नाटक खरोखरच प्रभावी होते. त्याच विषयावरील शं. ना. नवरे यांचे धुम्मस आज गाजत आहे आणि रंगा संत यांचे अठ्ठावीस दिवस एका नामवंत व्यवसायीक कलाकाराने मी व्यवसायी कंरंगभूमीवर आणतो असे म्हणून कुजवून टाकले. ते नाटक वेळीच रंगभूमीवर येते, तर कदाचित रंगा संत यांना मोठी संधी मिळाली असती, आज धुम्मस गाजत असताना अठ्ठावीस दिवसचे स्क्रीप्ट कुजत पडावे याची खंत संबंधितांना वाटणे स्वाभाविक आहे. पण हा व्यवसायच असा आहे, की मनुष्य किंवा कलाकृती कितीही गुणी असली तरी योग यावा लागतो. ◻ ◻ ◻

**पंडित वि. म. जोशी**
**ज्योतिष विशारद**

---

## १३ ते १९ मार्च १९७१

**मेष :** आरोग्य चांगले राहील. धनस्थानची स्थिती चांगली राहील. प्रवास टाळावा. भावंडांकडून त्रास होईल. पहिले दोन दिवस हातातील सरकारी कामे उरकून घ्यावीत. घरात पत्नीच्या माहेरची माणसे सोमवारी-मंगळवारी येऊन काहीतरी समारंभ होईल. गृहस्वास्थ्य थोडेसे बिघडण्याचा संभव आहे. थोडासा स्वभावात हेकटपणा येईल. सार्वजनिक कामात भरपूर यश येईल.

विद्याभ्यासात थोडेसे अडथळे येतील. सरकारी अनुदान मिळण्याच्या बाबतीत अनेक अडचणी उत्पन्न होतील. संततीकडून त्रासदायक वागणूक होईल. भागीदार व पत्नीकडून सर्व प्रकारची मदत होईल. व्यापारधंदा चांगला चालेल. प्रेमाच्या अनपेक्षित सापळ्यात सापडण्याचा योग आहे. हा अनुभव २७ ते ३२ वयातील व्यक्तींना जास्त येईल. फॅन्सी वस्तूंच्या व्यापाऱ्यांना भरपूर नफा होईल.

चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानातून आहे ते चांगले आहे. शुभ तारखा १३।१४ १५।१६।१७.

**वृषभ :** शरीरप्रकृती नरमच राहील. थोडासा वातविकाराचा त्रास होईल. धनस्थिती चांगली राहील. प्रवासयोग येईल. हातून पराक्रम घडेल. सार्वजनिक कामात यशप्राप्ती होईल. घरात काहीतरी शुभसमारंभ घडेल. कन्या संततीचा भाग्योदय होईल. घरासंबंधीचे प्रश्न समाधानकारक रीतीने सुटतील.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. पत्नीकडून आणि भागिदारांकडून थोडासा त्रास होण्याचा योग आहे. २८ ते ३२ मधील व्यक्तींना याचा अनुभव जास्त येईल. प्रेमविवाहित व्यक्तींमध्ये खटके उडतील. उद्योग-धंदा जरा मंदावेल. तेल, जमीनीची खरेदी-विक्री, कआण वगैरे धंदे करणाराला त्रास जाणवेल. कदाचित पत जाण्याचा योग येईल. पण गुरु व रवी महाराजांच्या कृपेने सर्व ठीक होईल. चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

**मिथुन :** शरीरप्रकृती चांगली राहील. अचानक येणारे पैसे हातात पडतील. शनवारी-रविवारी हा योग येईल. धार्मिक कामाकरता प्रवास घडेल. सहकुटुंब जाण्याचा योग आहे. घरात आनंदीआनंद व उत्साहवर्धक वातावरण राहील. हातून पराक्रम घडेल. सरकारी कामात संपूर्ण यश मिळेल.

विद्याभ्यासात अपयश येईल. विशेषत: मेडिकल व्यवसायातील व्यक्तींच्या हातून चुकीचे रोग निदान होईल. तरुण डॉक्टरांना (२८ ते ३२) जास्त भिती

आहे. शत्रूकडून त्रास होईल. पण शेवटी दशमातील रवी सर्व अडचणी दूर करील. बौद्धिक व्यवसायातील लोकांना सप्ताह प्रगतीपथावर नेणारा आहे. लेखक, प्रकाशक यांना सरकारी मदत मिळेल.

चंद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानातून आहे ते चांगलेच आहे. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

**कर्क :** शरीरप्रकृती चांगली राहील. धार्मिक विचार मनात गर्दी करतील. धनस्थानाची स्थिती समाधानकारक राहील. प्रवासयोग येईल. सरकारी कामाकरता बाहेर गावी जाणे पडेल. घरात सुखदायक वातावरण राहील. घरात वडीलमाणसापैकी कोणीतरी बरेच आजारी पडण्याचा योग आहे. शत्रूनाश निश्चित होईल. भावंडाकडून सर्व प्रकारची मदत होईल.

विद्याभ्यासात नेत्रदीपक प्रगती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी नोकरीत विशेषत: कोर्टाशी संबंध असलेल्या जज्ज, प्रॉसिक्युटर, पोलीस अधिकारी यांना कामाचा, ताण पडेल. भागिदार जरा फसवेगिरीने वागण्याचा योग आहे. सरकारी कामात भरघोस यशप्राप्ती होईल. गुरू-रवीच्या ९।५ योगाने सर्व संकटांचे निवारण होईल.

चंद्राचे भ्रमण ३।४।५ या घरातून होत आहे ते चांगले आहे. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

**सिंह :** शरीरप्रकृती जरा नादुरूस्त होईल. उष्णविकाराचा बराच त्रास होईल. वडीलार्जित मालमत्तेचे पैसे हातात पडतील. वडीलभावंडापकी कोणीतरी आजारी पडण्याचा संभव आहे. ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना हा अनुभव जास्त तीव्रतेने येईल. प्रवासयोग सोमवारी-मंगळवारी येईल तो टाळावा. गुरुवार-शुक्रवार घरात काहीतरी शुभसमारंभ घडेल.

विद्याभ्यासात भरघोस यशप्राप्ती होईल. गुरू-मंगळाचा अन्योन्य योग बुद्धीच्या व विद्येच्या जोरावर मानमान्यता मिळवून देईल. भागिदारांकडून भाग्योदयकारक गोष्टी घडतील. शत्रूनाश होईल. मातुल घराण्याकडून चांगली वागणूक घडेल. फॅन्सी वस्तूचे व्यापारी, पेंटर्स, मेडिकल उपकरणाचे व्यापारी या सर्वांना मनसोक्त द्रव्यलाभ होण्याचा योग आहे. अचानक धनलाभ होईल. सर्व सप्ताह शुभफलदायी.

**कन्या :** शरीरप्रकृती चांगली राहील. सप्तमातील स्वगृहावर पाहणारा बुध आरोग्य व मानमरातब वाढवील. त्याचे बरोबर रवी आहे. सरकारी कामात यशप्राप्ती होईल. धनस्थिती जरा अडचणीची राहील. प्रवास योग येईल. बरेच दिवस फिरतीवर असलेले अधिकारी घरी येतील. अचानक धनलाभ होईल.

विद्याभ्यासात माघार घ्यावी लागेल. अडचणी उत्पन्न होतील. शास्त्राचा अभ्यास करणारांना जास्त त्रास होईल. संततीपासून मनाविरुद्ध वागणूक केली जाईल. शत्रूचा नाश होईल. उद्योगधंदा चांगलाच चालेल.

तूळ : शरीरप्रकृती नरमच राहील. मूत्र विकाराचा त्रास होईल. ४२ चे पुढील वयाच्या व्यक्तींना जास्त त्रास होईल. घरात मतभेद होतील. वाचाशुद्धी वाढेल. धनस्थिती समाधानकारक राहील. व्यवहारातील भागीदाराबरोबर प्रवास योग येईल. त्यात फायदाच होईल. घरात सोमवार-मंगळवारी थोडेसे मतभेद होतील.

विद्याभ्यासात प्रगतीकारक दिवस आहेत. संततीची प्रगती होईल. सरकारी नोकरीत असलेली मुले सोमवार-मंगळवारला प्रमोशनच्या गावीं जाण्याकरता निघतील. एजन्सीच्या व्यवहारातील व्यक्तींना आठवडा प्रगतीपर आहे. तीर्थयात्रा करणचा योग येईल. भावंडांकडून त्रासदायक वागणूक होईल.

वृश्चिक : शरीरप्रकृती चांगली राहील. लग्नातील गुरु सर्वबाबतीत शुभ फल देईल. धनस्थिती चांगली राहील. गुरु-मंगळाचा अन्योन्य योग चांगला आहे. प्रवास योग येईल. व्यापाराकरता प्रवास योग येईल. फॅन्सी मालाच्या व्यापाऱ्यांना हा योग जास्त येईल. मामाकडील माणसे येऊन घरात काहीतरी शुभ कार्य घडून येईल.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. अधिपति व कारक एकच ग्रह गुरु आहे. तो लग्नी असून पंचम स्थानावर पाहतो. या योगाने संततीचा भाग्योदय होईल. सरकारी कामात यश मिळेल. मित्रांकडून सर्वबाबतीत मदत होईल. उद्योगधंदा चांगला चालेल. अचानक धनलाभ होईल. शत्रूनाश होईल.

धन : शरीर प्रकृती जरा नरमच राहील. पोटातील विकार होण्याचा योग आहे. पैशाच्या अनेक अडचणी निर्माण होतील. स्वभावात तापटपणा येईल. भावंडाशी जमेल. घरात लग्नाच्या वाटाघाटी होण्याची बरीच शक्यता आहे. चतुर्थातील रवी-बुध व व्ययातील गुरु यांचा ९।५ योग चांगला आहे. सर्व बाजूनी मदत होईल सरकारी कामात यशप्राप्ती होईल.

विद्याभ्यासात प्रगतीला अडथळे येतील. कारण व्ययात आहे. मात्र विद्याधिपति लग्नी आहे. त्यामुळे मेडिकलकडील विद्यार्थ्यांना त्यातल्या त्यात बरे दिवस जातील. मित्रांना पैशांची मदत करावी लागेल. व्यापारी वर्गाला दिवस फारच चांगले आहेत. शुभ समारंभाकरता बराच पैसा खर्च करावा लागेल.

चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानातून आहे. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

मकर : शरीर प्रकृती बिघडेल. वातविकाराचा उपद्रव होईल. मनस्वास्थ्य राहणार नाही. घरात काहीतरी कलह निर्माण होईल. हा योग सोमवार मंगळवारी जास्त आहे. पैशाची परिस्थिती बरी राहील. प्रवास योग येईल. त्यात फायदा होऊन भाग्योदय होण्याला मदत होईल. हा योग शनिवारी-रविवारी येईल.

विद्याभ्यासांत संपूर्ण यश प्राप्ती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. दूर असणाऱ्या मुलाची बदली राहत्या गावाजवळ होईल. व्यापार-धंदा चांगलाच चालेल. फॅन्सी-वस्तूंचा व्यापार करणारांना अमाप पैसा मिळण्याचा योग आहे. वडील-भावंडा-कडून व मित्रांकडून सर्वप्रकारची मदत होईल.

कुंभ : शरीर प्रकृती चांगली राहील. थोडासा मूत्राशयाचा विकार होण्याची शक्यता आहे. धनस्थानाची स्थिती बिघडेल. केवळ दशमातील गुरु आयत्यावेळी अडचणीतून मोकळीक करील. भावंडांशी जमणार नाही. पत्नीकडून व भागीदारांकडून चांगली वागणूक व मदत मिळेल. घरात विवाहाच्या वाटाघटी होतील. प्रत्यक्ष होण्याला थोडा अवकाश आहे.

विद्याभ्यासात यश प्राप्ती होईल. सरकारी मान्यता मिळेल. विद्येच्या जोरावर अचानक धनलाभ होण्याचा योग आहे, शिक्षक साहित्यिक, ज्योतिषी वगैरे बद्धीजीवी वर्गाला त्यांच्या धंद्यात यश व पैसा दोन्ही मिळण्याचा योग आहे. भाग्योदय होईल. मानमान्यता मिळेल. सर्व बाजूनी प्रगतीकारक आठवडा आहे.

मीन : शरीर प्रकृती चांगली राहील. चारही केंद्रांचे अधिपती गुरु-बुध यांचा ९।५ योग आहे. शिवाय धन व भाग्यस्थानचा अधिपति दशमात आहे. सर्व बाबतीत अचानक नेत्रदीपक प्रगती होईल. पैशाची ओढ ताण होईल. पण भाग्यातील गुरू सर्व अडचणी निभावून नेईल.

संततीकडून शनिवार रविवार अत्यंत त्रासदायक वागणूक होईल. प्रत्येक बाबतीत मतभेद होईल. त्याला जपावे. प्रकाशक, लेखक, पुस्तक विक्रेते यांना पुढे येणारा दिवस चांगले आहे उद्योगधंदा चांगला चालेल. यांत्रिक कारखान्यांना सरकारी अनुदान मिळेल. मिलिटरीतील मुलांना प्रमोशन मिळण्याचा योग आहे. □ □ □

---

## दिल्ली वार्ता

पृष्ठ ६ वरून

दुसरा कापलेला भाग असा– तुघलक म्हणतो, " माझ्याजवळची सत्ता हिसकविण्याचा कुणी प्रयत्न केला, तशी धमकी दिली तर रेडिओ माझ्या ताब्यात आहे. विरोधी पक्ष माझ्या पायाशी आहेत. समाजवाद तर ओठावरच आहे. सत्ता टिकून रहावी म्हणून मी वाटेल ते करीन. मी पक्षाचे दोन तुकडे केले आता गरज पडली तर देशाचीसुद्धा दोन छकले पाडीन."

असा हा चो आपल्या लेखणीच्या ताकदीची कल्पना देशात इतरांना सुद्धा येता यावी यासाठी तुघलक पाक्षिक इंग्रजीत काढणार आहे चित्रपट महंमद बिन तुघलकच्या हिंदी–इंग्रजी रूपांतराच्या कामाला सुरवात देखील झाली आहे.

पण मद्रासमध्ये द्र. मु. क. सरकार संत्रस्त झाले आहे. कारण पुन: निवडून आलं तरी चो चा त्रास कसा चुकविणार ?

आता तर तो तामिळ दैनिक काढतो आहे ! □ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ब. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

दुसरे महायुद्ध सुरू केव्हा झाले
आणि संपले केव्हा हेच त्यांना कळले नाही.

एक...दोन...तीन...
तब्बल सोळा वर्षे
लपत छपत
रानावनात, दऱ्याखोऱ्यात
शत्रूपासून जीव बचावण्यासाठी...

१९६० साली गुयामच्या निबिड जंगलात
अखेर ते पकडले गेले

## इटो मसाशी

त्यातला एक

आयुष्यात कधीही विसरला न जाणारा
अतिशय चित्तथरारक असा
सोळा वर्षांचा कालखंड तो

## एम्परर्स लास्ट सोल्जर्स

या पुस्तकात वर्णन करतो.
ह्या पुस्तकाची ओळख

माणूस : पुढील अंकी...